रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २०८
www.ramprahar.com
◆ शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

राज्यातील २७ ओबीसी जातींच्या प्रश्नावर हालचाली/२
मासेमारी जाळ्यात अडकलेल्या कासवाला जीवदान/५
वर्ल्डकपमध्ये झिम्बाब्वेकडून ऑस्ट्रेलियाचा पराभव/८

## पीएम मोदींच्या हस्ते सेवा तीर्थ, कर्तव्य भवनचे उद्‌घाटन



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि.१३) राजधानी दिल्लीतील नवीन पीएमओ 'सेवा तीर्थ तसेच कर्तव्य भवन-१ आणि कर्तव्य भवन-२ या प्रशासकीय संकुलांचे उद्‌घाटन केले. या वेळी बोलताना त्यांनी हा क्षण भारताच्या विकास यात्रेतील नवा अध्याय असल्याचे सांगत, गुलामीच्या प्रतीकांपासून मुक्त होत देश नव्या इतिहासाची निर्मिती करीत असल्याचे अधोरेखित केले. या बदलांदरम्यान जुन्या इमारतींचे ऐतिहासिक महत्त्व जपले जाईल, असेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, जुन्या इमारतींमध्ये घेतलेले निर्णय आणि त्या परिसरातील आठवणी कायम राहतील. त्यामुळे नॉर्थ आणि साउथ ब्लॉकचे रूपांतर राष्ट्रीय संग्रहालयात करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्‌घाटन समारंभास केंद्रीय गृहनिर्माणमंत्री मनोहर लाल, पीएमओतील राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि अधिकारी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक

## ५७६ कोटींचा प्रारूप आराखडा मंजुरीसाठी सादर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. १२) मुंबईत पार पडली. या वेळी जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत ५७६ कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा राज्य सरकारकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला.



रायगडचे पालकमंत्री रिक्त असल्याने जिल्हा नियोजन समितीची बैठक मुंबईत झाली. या बैठकीस राज्याच्या महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्यासह जिल्ह्यातील आमदार, खासदार, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आँचल दलाल, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी उपस्थित होते. (पान २ वर..)

**सन २०२५-२६मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी ४८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. हा निधी प्राप्त झाला असून ८० टक्के मंजूर कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यातील जवळपास ६० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. येत्या दीड महिन्यात उर्वरित निधी खर्च होईल.**
**-उमेश सूर्यवंशी,**
जिल्हा नियोजन अधिकारी, रायगड

## अजितदादांच्या निधनाने कबड्डी खेळाचे मोठे नुकसान -लोकनेते रामशेठ ठाकूर



### पनवेलमध्ये पंचांसाठी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मातीतल्या खेळांपैकी एक कबड्डीचा आधारस्तंभ असलेले अजितदादा पवार यांच्या निधनामुळे या खेळाचे मोठे नुकसान झाले आहे, असे भावूक उद्‌गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला व पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्हा कबड्डी पंच शिबिराचे आयोजन पनवेलच्या मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात करण्यात आले होते. त्या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून ते बोलत होते.

शिबिरास महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह अ‍ॅड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या प्रमुख कार्यवाह डॉ. चित्रा पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रसाद भोईर, प्रमुख मार्गदर्शक जे.जे. पाटील, जगदीश पाटील, शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम, सुमित माने, नरेश म्हात्रे, जनार्दन पाटील, पनवेलचे क्रीडा प्रमुख व्ही.बी. नाईक, पंच मंडळाचे सचिव अ‍ॅड. अजिंक्य पाटील, कार्यालयीन प्रमुख अनिल कोळी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, स्व. अजितदादा हे क्रीडा क्षेत्रातील आधारस्तंभ होते. कबड्डी खेळाच्या विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले असून खेळाडूंना पाच टक्के नोकरी आरक्षण मिळवून देण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. पनवेलमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या अनेक स्पर्धांना त्यांची प्रमुख उपस्थिती लाभायची. महाराष्ट्र ऑलिंपिक कबड्डी संघटनेचे अध्यक्षपद भूषविलेल्या अजितदादा यांच्या निधनाबद्दल त्यांनी दु:ख व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली तसेच २० ते २२ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत शिबिराला शुभेच्छा दिल्या.

राज्य कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह अ‍ॅड. आस्वाद पाटील यांनी पंचांच्या अडचणी व तक्रारी जाणून घेत मार्गदर्शन केले. पंचांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे समाधानकारक निरसन करत संघटना पंचांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हे शिबिर सकाळ व दुपार अशा दोन सत्रांत पार पडले.

## राजिपमध्ये शिवसेना गटनेतेपदी मानसी दळवी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी शुक्रवारी (दि. १३) जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन गटाची नोंदणी केली. आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी यांची शिवसेना गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेनेचे २१ सदस्य निवडून आले आहेत. या सदस्यांची गट नोंदणी शुक्रवारी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात हजर राहून व सर्व सदस्यांची ओळख पटवून करण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांच्यासमोर ही प्रक्रिया पार पडली.



### महायुतीचा धर्म पाळणार -आमदार महेंद्र दळवी

आगामी काळात जिल्हा परिषदेत महायुतीचीच सत्ता स्थापन होईल, असा ठाम विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी या वेळी व्यक्त केला. महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदांच्या निकालांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी महायुती धर्म पाळून पुढे जाण्याचे आदेश दिले आहेत. शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि समित्यांबाबत योग्य निर्णय घेतील. जनतेची सेवा करण्यासाठी आणि आगामी ग्रामपंचायत, लोकसभा व विधानसभा निवडणुका लक्षात घेता महायुतीने एकत्र राहणे गरजेचे असल्याचे आमदार दळवी यांनी नमूद केले.

## उलवे नोड येथे आज आढावा बैठक

**उलवे नोड** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा तसेच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला व पुरुष गटाच्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसंदर्भातील आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. १४) सायंकाळी ५ वाजता उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये ही बैठक होणार आहे. या बैठकीस समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच संबंधित मान्यवरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### गहू, साखर निर्यातीला केंद्र सरकारकडून मंजुरी

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने २५ लाख टन गहू आणि पाच लाख गहू पदार्थांच्या निर्यातीला परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे साखर निर्यातीचा कोटाही पाच लाख टनांनी वाढवला आहे. देशात पुरेसा साठा असल्याने आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सरकारचे म्हणणे आहे. निर्यातीचा देशातील बाजारावर परिणाम होणार नाही, असेही सरकारने म्हटले आहे.

### सोने आणि चांदीच्या दरात सलग दुसऱ्या दिवशी घसरण

**मुंबई** : सोने आणि चांदीच्या दरात शुक्रवारी (दि.१३) सलग दुसऱ्या दिवशी लक्षणीय घसरण झाली आहे. मल्टी-कमोडिटी एक्सचेंजवर एकाच दिवसात सोने आणि चांदीच्या किमती ३२ हजार रुपयांपर्यंत घसरल्या. याआधी २९ जानेवारी रोजी चांदीने प्रति किलो ४.२० लाख रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला, तर सोन्याने १.९३ लाखांपर्यंत उसळी मारत दोन लाखांच्या जवळ झेप घेतली होती, मात्र आता सोने आणि चांदी दोन्ही त्यांच्या विक्रमी उच्चांकावरून लक्षणीयरीत्या घसरले आहेत.

## साईबाबांच्या पादुकांचे पनवेलमध्ये होणार दर्शन

### नियोजन बैठकीत सोहळ्याच्या तयारीचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरातील साईभक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. येत्या १८ ते २० फेब्रुवारीदरम्यान पनवेल येथील साईबाबा मंदिरात शिर्डीतील साईबाबांच्या पादुका भाविकांच्या दर्शनासाठी येणार आहेत. या पार्श्वभूमीवर तीन दिवसीय धार्मिक सोहळ्याच्या नियोजनासाठी पनवेल शहरातील श्री साईबाबा मंदिर व श्री साई नारायणबाबा आश्रमात नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीला पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, साई मंदिराचे ट्रस्टी रामलाल चौधरी, राम थदाणी, भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेवक राजू सोनी, नगरसेवक दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, कळंबोलीचे माजी शहराध्यक्ष रविनाथ पाटील, विनोद पाटील, कामगार नेते रवींद्र नाईक, पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, मल्हार नेटवर्क प्रा.लि.चे संचालक स्वप्नील ठाकूर, भाजप शहर उपाध्यक्ष रूपेश नागवेकर, भालचंद्र जुमलेदार, डॉ. शकुं बातीजा यांच्यासह मोठ्या संख्येने साईभक्त उपस्थित होते. (पान २ वर..)

## एमपीएससीची गुणवत्ता यादी जाहीर

**नागपूर** : सहायक प्राध्यापक, क्षयरोग व उरोरोगशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट - ब या संवर्गाच्या मुलाखती ११ व १२ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात आल्या होत्या. विचाराधीन संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे दाखल प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

निलेश महाजन यामध्ये पहिले आहेत. या गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांचे गुणही जाहीर करण्यात आले आहेत. प्रस्तुत संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दावे, शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

## लोणावळा येथे दरीत उडी मारून आयटी कर्मचाऱ्याची आत्महत्या

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



लोणावळ्यातील लायन्स पॉईंट येथे एका आयटी कंपनीतील कामगाराने खोल दरीत उडी घेत आत्महत्या केली. काही दिवसांपूर्वी लोणावळा येथे एका तरुणीने आत्महत्या केली होती. त्यानंतर आताची ही दुसरी घटना आहे.

वीरेंद्र सिन्हा (वय ३२, रा. पुणे) हा बाणेर येथील एका आयटी कंपनीत कामाला होता. तो गुरुवारी आपली चारचाकी गाडी घेऊन लोणावळ्यातील लायन्स पॉईंट येथे फिरायला आला होता, मात्र त्याने अचानक त्याच्या मित्रांना आणि पत्नीला मेसेज व मेलद्वारे कळवून लायन्स पॉईंड येथील खोल दरीत उडी घेऊन आत्महत्या केली.

या घटनेची माहिती मिळताच लोणावळा पोलिसांनी शिवदुर्ग टीमला तत्काळ बोलावून घटनेचा तपास सुरू केला. ज्या ठिकाणी वीरेंद्रने गाडी उभी केली होती तेथूनच समोरील सुमारे अडीचशे फूट खाली दरीत त्याचा मृतदेह आढळून आला. शिवदुर्ग टीमने अडीचशे फूट खोल दरीत उतरून मृतदेह दोरीच्या सहाय्याने बाहेर काढून लोणावळा पोलिसांच्या स्वाधीन केला.

काही दिवसांपूर्वी एलएलबीचे शिक्षण घेणाऱ्या नवी मुंबईतील २० वर्षीय तरुणीने लोणावळ्यातील टायगर पॉईंट येथून अंदाजे ४०० फूट खोल दरीत उडी घेऊन आत्महत्या केली होती. ३६ तासांहून अधिक काळ चाललेल्या शोधमोहीमेनंतर या तरुणीचा मृतदेह खोल दरीत आढळून आला. त्यानंतर अशाच प्रकारची घटना लोणावळ्यात घडली आहे.

## वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉनचे अलिबागेत स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाद्वारे (सीआयएसएफ) आयोजित वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ या भव्य सायकल मोहिमेचे शुक्रवारी (दि.१३) अलिबागमध्ये आगमन झाले. येथील सरखेल कान्होजी आंग्रे नगरीत आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे आणि सीआयएसएफ डेप्युटी कमांडंट संदीप चक्रवर्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत या चमूचे स्वागत करण्यात आले.




वंदे मातरम् गीताच्या १५०व्या वर्षानिमित्त आणि किनारी सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी सीआयएसएफ वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ या भव्य सायकल मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. २८ जानेवारी ते २२ फेब्रुवारी या कालावधीत सीआयएसएफ जवानांचे दोन संघ भारताच्या नऊ किनारी राज्यांमधून आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधून सुमारे ६,५५३ किलोमीटर प्रवास सायकल चालवत करणार आहेत. एक संघ गुजरातच्या लखपत किल्ल्यावरून (पश्चिम किनारपट्टी) आणि दुसरा संघ पश्चिम बंगालच्या बक्खली येथून (पूर्व किनारपट्टी) निघाला आहे. या दोन्ही संघांचा समारोप कोची (केरळ) येथे होईल. यामध्ये १३० जवान सहभागी असून ५० टक्के म्हणजेच ६५ महिला सायकलपटूंचा समावेश आहे.

आरसीएफ थळ युनिट येथील डेप्युटी कमांडंट संदीप चक्रवर्ती यांच्या नेतृत्वाखाली गुजरात येथून निघालेला संघ मुंबईत ११ फेब्रुवारी रोजी पोहचला, तेव्हा गेटवे ऑफ इंडिया येथे अंडर-१९ क्रिकेट विश्वविजेता कॅप्टन आयुष म्हात्रे याच्या विशेष उपस्थितीत या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

१२ फेब्रुवारीला अलिबागेत आगमन झालेल्या चमूचा सन्मान आरसीएफ वसाहतीमध्ये आयोजित एका विशेष कार्यक्रमात करण्यात आला. या वेळी आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांच्या हस्ते सहभागी जवानांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान डेप्युटी कमांडंट संदीप चक्रवर्ती यांनी या मोहिमेतील त्यांचे अनुभव कथन केले. त्यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सीआयएसएफ कर्मचारी, आरसीएफ शाळा आणि गोंधळपाडा झेडपी शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्ये सादर करून सायकलिस्ट जवानांचे मनोरंजन केले. थळ येथील साईकृपा म्युझिक ग्रुपने ब्रास बँडवर वाजविलेल्या वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष वझे यांनी केले, तर असिस्टंट कमांडंट यू.बी. मीना यांनी आभार मानले.

## शिवजयंतीनिमित्त उलवे नोडमध्ये मिरवणूक आणि महाराष्ट्राचा शाहिरी बाणा कार्यक्रम

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य जयंती उत्सव सोहळा गव्हाण येथील छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीतर्फे गुरुवारी (दि. १९) उलवे नोड येथे आयोजित करण्यात आला आहे.



या उत्सवात सकाळी ८.३० वाजता गव्हाण येथून मिरवणुकीला सुरुवात होणार असून ९.३० वाजता उलवे नोडमधील खारकोपर रेल्वेस्थानकाजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर उत्सव सोहळा होणार आहे.

या उत्सव सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांची उपस्थिती असणार आहे.

जयंती सोहळ्यानिमित्त त्याच दिवशी रामशेठ ठाकूर मैदानावर सायंकाळी ७ वाजता द फोक आख्यान या कार्यक्रमातील सुप्रसिद्ध शाहीर चंद्रकांत माने आणि शाहिरा ऋतुजा माने यांचा महाराष्ट्राचा शाहिरी बाणा हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असणार आहे.

या संपूर्ण उत्सवात शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती गव्हाणचे अध्यक्ष वसंत पाटील, उपाध्यक्ष अशोक कडू, जयवंत देशमुख, खजिनदार गजानन घरत, छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती तसेच गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावाखाडी, उलवे, वहाळ, मोरावे, बामणडोंगरी, जावळे व उलवेनोड ग्रामस्थांनी केले आहे.

# राज्यातील २७ ओबीसी जातींच्या प्रलंबित प्रश्नावर निर्णायक हालचाली सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २७ ओबीसी जाती व पोटजातींना केंद्र शासनाच्या इतर मागासवर्गीय यादीत समाविष्ट करण्याच्या प्रलंबित प्रश्नावर अखेर निर्णायक हालचाली सुरू झाल्या आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार खटीक यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करत या प्रलंबित प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्याची विनंती केली आहे. या संदर्भात महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचे पदाधिकारी दिल्ली येथे दोन दिवसीय दौऱ्यावर असून, त्यांनी केंद्रीय मंत्रालयातील उच्च अधिकाऱ्यांची तसेच राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांची भेट घेऊन विषयाच्या जाणीव करून दिली.



बडगुजर सर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, पोवार, भोयर, पवार, बेलदार, कापेवार, मुन्नार कापेवार, मुन्नार कापू, तेलंगा, तेलंगी, पेंटारेड्डी, बुकेकारी, लोध, लोधा, लोधी, डांगरी, कुलवंत वाणी, वाणी (कुलवंत), कराडी, कानोडी, नेवे वाणी, सलमानी, निषाद, मल्ला, मल्लाह अशा सदर २७ जातींना राज्यात आरक्षण सुविधा असली तरी केंद्राच्या यादीत आरक्षणाची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक व रोजगार क्षेत्रात मोठे नुकसान सोसावे लागत आहे.

या संदर्भात महाराष्ट्र मागासवर्ग आयोग, सामाजिक न्याय विभाग आणि राष्ट्रीय पिछडा वर्ग आयोग यांनी संयुक्त सुनावणी करून अहवाल सादर केला असून, आता या प्रस्तावाला केंद्रीय कॅबिनेटची अंतिम मंजुरी आवश्यक आहे. या मंजुरीसाठी दीड वर्षांपासून प्रतीक्षा सरू असून महाराष्ट्र ओबीसी कृती समितीने वेळोवेळी दिल्ली, मुंबई, पुणे येथे जाऊन केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, आमदार, खासदार, तसेच भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाशी चर्चा केली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये समितीच्या प्रतिनिधींनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदनही सादर केले होते. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्लीतील मंत्रालयात समितीच्या पदाधिकाऱ्यांची केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार खटीक यांच्याशी भेट झाली.

या वेळी आमदार परिणय फुके यांच्या विशेष सहकार्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः दूरध्वनीद्वारे मंत्र्यांशी संवाद साधून विषयावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली. यादरम्यान, माजी केंद्रीय मंत्री व राष्ट्रीय पिछड़ा वर्ग आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहिर तसेच वर्ध्याचे खासदार अमरजी काळे यांचीही भेट घेऊन विषय तातडीने कॅबिनेटमध्ये मांडण्याची मागणी समितीने केली.

या दौऱ्यात महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचे अध्यक्ष श्रावण फरकाडे, उपाध्यक्ष विलास पाटील, सहसचिव प्रल्हाद कासकर, वरिष्ठ मार्गदर्शक डॉ. नामदेव राऊत, सल्लागार मधुकर चोपडे, महासचिव मोरेश्वर भादे, सचिव दीपक नेवे यांचा समावेश होता. या मोहिमेत आमदार परिणय फुके, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष कार्यकारी अधिकारी सुधीर दिवे, विठ्ठल चोपडे, युवा भोयर-पवार मंचाचे उपाध्यक्ष अमोल खोडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी पनवेल मनपाची सखोल स्वच्छता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५०व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य हिंद-दी-चादर कार्यक्रमाची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहचली आहे.



खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेमार्फत सखोल स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार हिंद कि चादर कार्यक्रम स्थळ, नियोजित पार्किंग, आजूबाजूच्या ठिकाणांना जोडणारे रस्ते इत्यादी ठिकाणी डीप क्लीन स्वच्छता केली जात आहे.

हिंद चादर कार्यक्रमस्थळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी स्वछतेबाबत पाहणी करुन सफाई कामगारांची संख्या वाढविणे व त्यांचे वेगवेगळे गट करून मैदानाच्या सर्व भागात साफसफाई करणे बाबत आवश्यक सूचना दिल्या. यानुसार डीप क्लीन अंतर्गत मनुष्यबळ तसेच महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी यांच्या टीम बनवून मैदानाच्या विविध भागांमध्ये साफसफाई करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

या मोहिमेचा हेतू श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या धन३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरिकांना उत्तम सुविधा पुरवणे व जास्तीत सामाजिक सहभाग वाढविणे हा असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवता आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक मानले जाते. त्यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त होणारा हिंद-दी-चादर कार्यक्रम हा केवळ स्मरणोत्सव नसून समाजात एकात्मता, बंधुभाव आणि सेवा भावनेचा जागर निर्माण करणारा ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

# महाडमध्ये रिक्षा अपघातात चालकाचा मृत्यू, प्रवासी जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील दहिवड हद्दीतील कर्ण रिसॉर्ट येथून आनंद उत्साह साजरा करून दहिवाड गावाच्या दिशेने जात असताना रिक्षाचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू झाला इतर प्रवासी जखमी झाले असून अपघातास कारणीभूत असलेल्या रिक्षा चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड तालुक्यातील दहिवड हद्दीतील कर्ण रिसॉर्ट येथून आनंद उत्साह साजरा करून दहिवाड गावाच्या दिशेने जात असताना रिक्षाचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये मयत सुजित सुधीर सकपाळ व जखमी अनिकेत धायाळकर, रोहिणी धायाळकर, अनंत धायाळकर सर्व राहणार नांदगाव ता महाड असे रिक्षा (एमएच ४६ बीडी ८५५३) ही मधून बिरवाडी बाजूकडून दहिवड बाजूकडे जात असताना वाहन उलटले. यात चालकांचा मृत्यू झाला. तसेच यातील सहप्रवासी यांचे किरकोळ जखमी झाले. ऑटो रिक्षाचे नुकसान झाले. या सर्व घटनेला कारणीभूत रिक्षा चालक सुजित सुधीर सकपाळ (वय २५, राहणार साकडी-कुसगाव) याचा जागीच मृत्यू झाला असून अन्य किरकोळ जखमी झाले आहेत.

घटनास्थळी महाड एमआयडीसी पोलीस दाखल झाल्याने पुढील तपास महाड एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

# मैफिल संगीत महोत्सवात मृदुला दाढे यांचा कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

मैफिल, अलिबाग या संस्थेतर्फे येथील आरसीएफ वसाहतीमध्ये १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित दोन दिवसीय संगीत महोत्सवात विख्यात संगीत अभ्यासक आणि गायिका मृदुला दाढे यांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण होणार आहे. याशिवाय या महोत्सवात युवा कलाकार अमन वरुडकर यांचे व्हायोलिन वादन तसेच ग्वाल्हेर घराण्याचे गायक पंडीत धनंजय हेगडे यांचे सुश्राव्य गायन, अशी भरगच्च सांगीतिक मेजवानी आहे.

डॉ. मृदुला दाढे या हिंदी चित्रपट संगीतातील संशोधनासाठी प्रसिद्ध असलेल्या ख्यातनाम गायिका, संगीत अभ्यासक आणि लेखिका आहेत.

चित्रपट संगीताचा सखोल अभ्यास, संगीत समीक्षक आणि 'सदाबहार' गीतांचे गायन यात त्या निपुण आहेत. लोकप्रिय हिंदी मराठी गीतांचे त्या करीत असलेले सांगीतिक विश्लेषण चांगलेच लोकप्रिय आहे. अभिनव कार्यक्रम आयोजित करण्याच्या मैफिलच्या परंपरेनुसार या वर्षीच्या महोत्सवात मृदुलाजी १५ फेब्रुवारी रोजी 'रहें ना रहें हम' हा त्यांचा रसिकप्रिय कार्यक्रम निलेश निरगुडकर यांच्यासह सादर करणार आहेत. या कार्यक्रमात त्यांना ऋषीराज साळवी, दिगंबर मानकर, संजय मेस्त्री व पंकज बनसोडे साथ लाभणार आहे.

महोत्सवात पहिल्या दिवशी प्रतिभाशाली उदयोन्मुख व्हायोलिन वादक अमन वरुडकर यांचे सादरीकरण होणार आहे. लंडनच्या ट्रिनिटी कॉलेजमधून प्रमाणपत्र प्राप्त अमन यांनी राहुल देशपांडे, अतुलकुमार उपाध्ये यांसारख्या दिग्गजांसोबत स्टेज शेअर केले आहे. पियानोवादनातही निपुण असलेले अमन आपल्या जादुई परफॉर्मन्ससाठी ओळखला जातो. या कार्यक्रमात त्याला तबल्यावर ताराशिष बक्षी यांची साथ लाभणार आहे.

याच दिवशी शास्त्रीय गायन सादर करणारे पंडित धनंजय हेगडे हे एक तरुण आणि प्रतिभावान हिंदुस्थानी शास्त्रीय गायक आहेत. कर्नाटकच्या संगीतमय वातावरणात लहानाचे मोठे झालेले हेगडे वयाच्या चौथ्या वर्षापासून संगीतातील सुरांचे ज्ञान (श्रुती/नोट) ओळखत होते. त्यांच्या गायकीत भावपूर्ण आलापी आणि रागस्वरूप उलगडण्याची वैशिष्ट्यपूर्ण शैली पाहायला मिळते. आपल्या गायकीत किराणा आणि ग्वाल्हेर घराण्याचा सुरेख संगम साधणारे धनंजय हे रसिकप्रिय युवा कलाकार आहेत. त्यांना या कार्यक्रमात तबल्यावर यती भागवत तर संवादिनीवर अनंत जोशी हे मुरब्बी कलाकार साथसंगत करणार आहेत.

मैफिल संगीत महोत्सवात सहभागी होण्यासाठी दीपक दुधाटे (९२८४० ७५९७१) किंवा गणेश कुलकर्णी (९९७०४ ५०५०१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# ओवेपेठच्या रामशेठ ठाकूर विद्यालयात पारितोषिक वितरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.१३)२०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात अध्ययन, क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील सभागृहामध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाचे समारंभ अध्यक्ष म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत होते. या कार्यक्रमासाठी भा.ज.पा. जिल्हा सरचिटणीस रायगड जिल्हा यतिन पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रभाकर जोशी, पनेवल तालुका सचिव जयदास तेलवणे, चिटणीस सचिन वासकर, अल्पसंख्यांक मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ईरशाद शेख तसेच खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय प्राचार्या निशा नायर आदी उपस्थित होते.



उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून केले.

इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा मार्च २०२५ मध्ये विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला होता या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या प्रथम तीन विद्यार्थ्यांना तसेच विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. या गुणवंत विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करणाऱ्या विषय शिक्षकांचाही सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त विद्यालयात वर्षभर विविध उपक्रम स्पर्धांचे आयोजन केले होते या उपक्रमांच्या स्पर्धांत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

राज्य क्रीडा व युवकसेवा संचलनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड व पनवेल महानगरपालिका यांच्या क्रीडा विभागामार्फत जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्सफुर्तपणे सहभागी होत सर्वाधिक एकूण १११ पदके विद्यालयास प्राप्त करुन विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धांमध्ये उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी खेळाडूंना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या वेळी अध्यक्षीय मनोगतामध्ये अरुणशेठ भगत यांनी गतवर्षी मार्च २०२५ च्या इ.१० वी बोर्ड परीक्षेमध्ये विद्यालयाचा निकाल नेहमीप्रमाणे १०० टक्के लागला त्याबददल सर्वांचे अभिनंदन केले. व हिच निकालाची परंपरा कायम ठेवावी व विविध स्पर्धांच्या माध्यमातून यश मिळवित विद्यालयाचे नाव राज्यपातळीवर करावे अशी आशा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक खांदेकर यांनी केले व सुत्रसंचालन जिविका वास्कर हिने केले. तर आभार कोमल यादव हिने मानले. कार्यक्रमाचे योग्य नियोजन परीक्षा विभाग प्रमुख अभिजित जोगदंडे, क्रीडा विभाग प्रमुख संभाजी जाधव, उपक्रम विभाग प्रमुख स्वप्नाली पवार यांनी केले होते.

# अलिबाग येथे सर्व हस्तकला शिल्पकारांसाठी चौपाल कार्यक्रम



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा कुंभार समाज सामाजिक संस्था रायगड, तसेच मुंबई विकास आयुक्त शिल्पकला (हस्तकला) विभाग, वस्त्र उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या विद्यमाने सर्व हस्तकला शिल्पकार व इतर समाज बांधवांसाठी चौपाल कार्यक्रम जिल्हा अधिकारी कार्यालय हॉल अलिबाग येथे आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी किसन नारायणराव जावळे साहेब, सहाय्यक निर्देशक हस्तकला शिल्पकला विभाग सुरेश नारायण तांडेकर, एसबीआय बँकेचे मुख्य प्रबंधक अधिकारी कुलकर्णी हे उपस्थित होते. कुंभार समाज बांधवांतर्फे समाजभूषण व कोकण रत्न पुरस्काराने (२०२५) सन्मानित रायगड जिल्हा कुंभार समाज अध्यक्ष अनंत महाडकर, रायगड जिल्हा कुंभार समाज उपाध्यक्ष नंदकुमार चिरनेरकर, कुंभार समाज महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गजानन चौलकर, रायगड जिल्हा कुंभार समाज सचिव दिलीप साळवी, खजिनदार सुनील आंजर्लेकर, कार्यकारणी सदस्य रामदास साळवी, वसंत कुंभार उपाध्यक्ष कोकण विभाग, मधुकर कुंभार कार्यालय सचिव, बजरंग भागवत अध्यक्ष पनवेल, गीता संतोष कुंभार महिला अध्यक्ष पेण, वैजयंती उकरुळकर महिला अध्यक्ष अलिबाग, कविता नागावकर अध्यक्ष अलिबाग शहर, रमेश नागावकर अध्यक्ष मुरूड, ज्योती रमेश नागावकर सदस्य रायगड जिल्हा परिषद, रेणुका थळकर महिला अध्यक्ष मापगाव, नगरसेविका संध्या पालवणकर, कुंदन गणेश कुंभार कांदळे पेण, सिद्धेश कुंभार युवा अध्यक्ष खोपोली, रुपेश सुभाष मांगुळकर आदी उपस्थित होते.

सर्व उपस्थित मान्यवरांनी समाज बांधवांना भारत सरकार तर्फे मिळणाऱ्या महत्त्वपूर्ण योजनांचे मार्गदर्शन केले आणि जास्तीत जास्त बांधवांनी यात सहभाग घेऊन आपली नोंदनी करावी हा आग्रह करण्यात आला. मुद्रा लोन, आर्टिजन कार्डचे फायदे आणि भारत सरकार तर्फे हस्तकला शिल्पकला विभाग वस्त्र उद्योगातर्फे मिळणाऱ्या विविध योजनांचा पूर्णपणे माहिती देण्यात आली.

कुंदन विन्हेरकर यांनी सूत्रसंचालन केले. व्यवस्थापन अलिबाग कुंभार समाज अध्यक्ष नंदकुमार पालवणकर व कुंभार समाज अलिबाग तालुका यांनी केले.

## पान १ वरुन

### रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक

सन २०२६-२७ करिता रायगड जिल्ह्यासाठी ३७६ कोटी ११ लाखा रुपयांचा नियत्वय मंजूर करण्यात आला आहे, ज्यात गाभा क्षेत्रासाठी २३८ कोटी २० लाख, बिगर गाभा क्षेत्रासाठी ११९ कोटी १० लाख, तर नाविन्यपूर्ण योजनांसाठी १८ कोटी ८० लाख रुपयांचा रुपयांचा समावेश आहे. त्यानुसार जिल्हा नियोजन विभागाने आराखडा तयार करून राज्य सरकारकडे सादर केला आहे.

सर्वच लोकप्रतिनिधींनी वाढीव निधी मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांकडे साकडे घातले आहे. नगरविकास विभागासाठी ८० कोटी, ग्रामीण रस्ते विकासासाठी ३५ कोटी, आरोग्य विभागासाठी २० कोटी, शाळांच्या देखभाल-दुरूस्तीसाठी १० कोटी, शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी १० कोटी, ग्रामविकासासाठी १५ कोटी आणि वनविभागासाठी २० कोटी असा एकूण २०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मिळावा अशी मागणी या वेळी करण्यात आली.

### साईबाबांच्या पादुकांचा पनवेलमध्ये दर्शन सोहळा

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पादुका दर्शन सोहळ्याच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा आणि तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. बैठकीत दर्शन व्यवस्था, भाविकांची सुरक्षितता, वाहतूक नियोजन तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# कमळ पतसंस्थेतर्फे भजनांचा अखंड गजर

**अलिबाग :** कमळ नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे महाशिवरात्री निमित्त रविवारी (दि. १५) भजनांचा अखंड गजर आयोजित करण्यात आला आहे. कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या अलिबाग येथील कार्यालयात हा भजनांचा अखंड गजर सकाळी ९ वाजल्यापासून हा कार्यक्रम सुरू होणार आहे. कामथ येथील श्री हनुमान प्रासादिक बालमित्र मंडळाचे बुवा शाम काठे यांचे भजन सकाळी ८ ते ९.४५ या कालावधीत होईल. आवास येथील श्री सिध्देश्वर प्रासादिक संगित, भजन मंडळ यांचे बुवा भूषण किशोर माळवी पांचे भजन सकाळी १० ते ११.४५ या कालावधीत होईल. आई काळंबादेवी प्रासादिक भजन मंडळचे बुवा महेंद्र पारील यांचे भजन दुपारी १२ ते १.४५ या कालावधीत होईल. ॐ स्वरदायिन संगीत भजन मंडळ, बोरिवली यांचे बुवा डॉ. निलेश म्हात्रे यांचे भजन दुपारी २ ते ३.४५ या कालावधीत होईल. ॐ साई प्रासादिक भजन मंडळ, खंडाळेचे बुवा स्वररत्न संदीपबुवा कडू यांचे भजन सायंकाळी ४ ते ६ या कालावधीत होणार आहे. या संगीत भजनांचा आनंद सर्वांनी घ्यावा असे आवाहन मुख्य संकलपक्त गिरीश तुळपुळे, संयोजक संतोष पूरव, कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी केले आहे.

# खापरखेडा विद्युत केंद्राला पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, (महानिर्मिती) च्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रास स्टेट जनरेटिंग युटिलिटी या गटात परफॉर्मन्स एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार रायपूर (छत्तीसगड) येथे आयोजित इंडियन पॉवर स्टेशन २०२६ कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (एन.टी.पी.सी.) यांनी केले होते.

महानिर्मितीच्या वतीने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मा. संचालक (संचलन) अभय हरणे यांनी स्वीकारला. हा पुरस्कार म्हणजे खापरखेडा वीज केंद्राच्या उत्कृष्ट कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि सातत्यपूर्ण वीज निर्मितीतील उल्लेखनीय कामगिरीची राष्ट्रीय पातळीवरील दखल आहे.



या समारंभास ऊर्जा मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल, ऊर्जा मंत्रालयाचे संयुक्त सचिव पियुष सिंग, छत्तीसगड शासनाचे ऊर्जा सचिव डॉ. रोहित यादव, एनटीपीसीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गुरदीप सिंग तसेच एनटीपीसीचे संचालक (वित्त) जे. के. श्रीनिवासन, महानिर्मितीच्या वतीने मा. कार्यकारी संचालक (संचलन) राजेश पाटील, मुख्य अभियंता पंकज नागदेवते, विराज चौधरी आणि अतुल सोनजे हे उपस्थित होते.

# निवडक

## फसवणूकप्रकरणी दोघांवर गुन्हा

**पनवेल :** ग्रुपमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास फायदा होईल असे सांगून ३१ लाख ५० हजारची फसवणूक केल्याप्रकरणी रश्मी पुनिया आणि यतीन शहा यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हरेंद्र सिंह हे सेक्टर १२ नवीन पनवेल येथे राहत असून त्यांना व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सामील करण्यात आले. या वेळी ग्रुपमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास फायदा होईल असा मेसेज ग्रुपमध्ये आला. आणि त्यांनी पैसे गुंतवले. पैसे सुरुवातीला गुंतवल्यानंतर त्यांना पैसे मिळाल्याने फायदा झाला. त्यामुळे त्यांनी जास्त रकमेची गुंतवणूक केली. दोन्ही अॅपमधून त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पैसे काढता आले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला.

## लाखोंची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** मोबाईल हॅक करून बँकेच्या अकाउंटमधून सहा लाख ६१ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अविनाश शिंदे हे कामोठे, सेक्टर ३५ येथे राहत असून त्यांना एका मोबाईल क्रमांकवरून बँकेची एपीके फाईल आली. ती फाईल ऑटो डाउनलोड झाली. त्यानंतर अकाउंट वरून पैसे काढण्याचा मेसेज आला. त्यांनी कस्टमर केअरला फोन केला, मात्र प्रोसेस होईपर्यंत त्यांचा मोबाईल हॅक झाला आणि मोबाईलमधून सहा लाख ६१ हजार रुपये रक्कम अकाउंटवरून काढली गेली.

# कळंबोली सर्कल येथील जंक्शनच्या कामाला गती





**वाहतूक कोंडीतून मिळणार दिलासा; काम प्रगतिपथावर**

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील कळंबोली सर्कल येथे जंक्शनच्या कामाला अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली आहे. मुंबई–पुणे महामार्ग, जेएनपीटी मार्ग आणि शहरांतर्गत वाहतुकीचा संगम असलेल्या या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ होत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर हाती घेण्यात आलेला हा प्रकल्प नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. या प्रकल्पाचे सुमारे ३० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे.

प्रकल्पांतर्गत एकूण आठ आर्म (मार्ग) आणि दोन अंडरपास उभारण्यात येणार आहेत. शिळफाटा ते स्टील यार्ड, पुणे ते शिळफाटा, पुणे ते मुंबई, पनवेल ते मुंबई, मुंबई ते पनवेल, मुंबई ते जेएनपीटी, जेएनपीटी ते पुणे आणि शिळफाटा ते पुणे अशा विविध दिशांना वाहतूक सुरळीत करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पनवेल ते शिळफाटा, पनवेल ते स्टील यार्ड या दोन अंडरपासमुळे स्थानिक वाहतुकीलाही मोठी मदत होणार आहे. या उड्डाणपुलामुळे कळंबोली सर्कलवरील सिग्नलवरील ताण कमी होऊन वाहनचालकांचा वेळ व इंधनाची बचत होणार आहे.

या प्रकल्पाचे ३० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई–पुणे, जेएनपीटी व पनवेल दरम्यानचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर कळंबोली सर्कलवरील दीर्घकालीन वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण सात उड्डाणपूल, दोन उपसरणी (अंडरपास) आणि ४५ जोडमार्ग उभारण्यात येणार आहेत. काही उड्डाणपुलांसाठी पाया, पाइलिंग आणि गर्डर बसविण्याची कामे सुरू झाली आहेत तसेच सेवा रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन वळणमार्गांची उभारणी आणि बांधकाम क्षेत्राभोवती सुरक्षात्मक बॅरिकेड्स उभारण्यात आले आहेत.

प्रकल्पाचे मॅनेजिंग हेड ऋषिकेश कोरडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कळंबोली सर्कलवरील बहुस्तरीय प्रकल्प हा वाहतूक कोंडीच्या समस्येवर दीर्घकालीन उपाय आहे. काम नियोजित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आम्ही विशेष दक्षता घेत आहोत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सिग्नल–विरहित व अधिक सुरळीत होईल. यामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल, अपघातांचे प्रमाण घटेल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. २०२७ अखेरपर्यंत हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

## नगरसेवक राजू सोनींची तत्परता; ऑईल सांडलेल्या रस्त्यावर टाकली माती



**पनवेल : वार्ताहर**

सुखम हॉस्पीटल येथील मुख्य रस्त्यावर शुक्रवारी (दि.१३) सकाळी अज्ञात वाहनातून ऑइल सांडल्याने येथे मोटरसायकल अपघात होऊन त्यात काही लोक किरकोळ जखमी झाले व काही वाहनांचे नुकसानदेखील झाले. याची माहिती येथील व्यापारांनी नगरसेवक राजू सोनी यांना फोनद्वारे कळवली.

सोनी यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली व त्यांचे सहकारी मंदार देसाई यांना तेथे बोलून त्यांना तत्काळ अग्निशामक दल यांना बोलण्यास सांगितले. मंदार देसाई यांनी राजू सोनी यांच्या मार्गदर्शनानुसार लगेचच अग्निशामक दल अधिकारी यांना सांगितले. लगेचच घटनास्थळी पनवेल अग्निशामक दल विभागाचे कर्मचारी त्या ठिकाणी अग्निशामक दलाचे वाहन घेऊन पोहचले. तसेच नगरसेवक राजू सोनी यांनी स्वतःचा माती भरलेला टेम्पो बोलवून त्या ठिकाणी स्वतः उभे राहून अग्निशामक दलाचे कर्मचारी यांच्याकडून तिथे माती टाकून घेतली.

त्यामुळे पुढील होणारे अपघात टाळले. त्यामुळे येथील सर्व व्यापाऱ्यांनी नगरसेवक राजू सोनी व त्यांचे सहकारी मंदार देसाई तसेच पनवेल अग्निशामक दलाचे कर्मचारी यांचे मनापासून आभार मानले.

## जीम मेंबर्सची फी परस्पर बँक खात्यावर वळवली

**सव्वा पाच लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल**

**पनवेल : वार्ताहर**

जे बी फिटनेस जिममध्ये येणाऱ्या जिम मेंबरची फीची रक्कम परस्पर स्वतःच्या बँक खात्यावर घेऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आशिष राजू पवार (रा. आदई) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

जयश्री बोरणारे यांचा जे बी फिटनेस नावाने जिमचा व्यवसाय नवीन पनवेल सेक्टर ६ येथे आहे. त्या ठिकाणी आशिष राजू पवार हा ट्रेनर आहे. तो जीम मेंबरची फी भरून घेत असे. नोव्हेंबर महिन्यात जिमचे बॅलन्स पेमेंट तपासून पाहत असताना जिम मेंबरची फी बाकी असल्याचे जयश्री यांना दिसले. बँक स्टेटमेंट व जिममध्ये असणारे चालू जीम मेंबर यांच्यामध्ये तफावत दिसून आली. त्यानंतर आशिष पवार यांनी कामावर येणे बंद केले. त्यानंतर एका जिम मेंबरने जयश्री यांना तीन महिन्यांच्या पॅकेजमध्ये वार्षिक पॅकेज आशिष यांना दिल्याचे सांगितले आणि ते पैसे त्याच्या स्वतःच्या बँक खात्यावर घेतले. पडताळणी केली असता अनुक्रमांक मध्ये बदल केल्याचे दिसले आणि जिमच्या रेट कार्ड प्रमाणे पैसे घेतलेले दिसून आले नाहीत. एकूण पाच लाख १० हजारांची फसवणूक केली.

## महापौर, उपमहापौरांनी घेतली आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील यांनी गुरुवारी आपल्या पदाचा अधिकृत पदभार स्वीकारल्यानंतर शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान विकासात्मक कामकाजाबाबत सकारात्मक चर्चा झाली. दरम्यान, नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौर यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार व्यक्त केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिका क्षेत्रातील शहर आणि गावातील सर्वांगीण विकासासाठी आणि पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि लोकाभिमुख उपक्रम राबविण्यावर भर देण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या वेळी कळंबोलीचे माजी शहराध्यक्ष रविनाथ पाटील हे उपस्थित होते. भेटीदरम्यान आगामी योजनांबाबत चर्चा करत पनवेलच्या विकासाला गती देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांनी सादर केला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनपट



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे येथील वार्षिक स्नेहसंमेलन अर्थात, न्यूयल डे मोठ्या उत्साहामध्ये पार पडला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मेंबर आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन प्रवासावर आधारित संकल्पना या कार्यक्रमात मांडण्यात आली. त्यांचा जीवन प्रवास दाखवणारा आणि त्यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा मिळावी या हेतूने या कार्यक्रमात त्यावरच आधारित नृत्याविष्कार तसेच नाटिका सादर केल्या गेल्या.

त्यांच्या जीवनातील विविध पैलू,, जसे त्यांचे बालपण,, मैत्री,, कुटुंबवत्सल, त्यांच्यातील समजभिमुख लोकनेता, इत्यादीचा प्रवास उलगडून दाखवण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून केला. अतिशय उत्साह पूर्ण आणि जल्लोषपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी, पालकांनी मोठ्या संख्येने यामध्ये सहभाग घेतला.तसेच या वेळी विविध क्षेत्रात पारितोषिके मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. केवळ विद्यार्थीच नाही तर शिक्षकांचाही गौरव करण्यात आला. विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांचादेखील या वेळी गौरव करण्यात आला. गुणी विद्यार्थ्यांचे कौतुक या वेळी करण्यात आले. कर्मवीर– एक अखंड प्रवास असा या वार्षिक स्नेहसंमेलनाचा विषय होता.

ज्यामध्ये एका कोळीनृत्याचाही अंतर्भाव करण्यात आला होता.ज्याचा आनंद सर्वांनीच मनमुराद घेतला. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आपले कौशल्य दाखवत गुणप्रदर्शन केले. या वेळी प्रमुख अतिथी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मेंबर लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर तसेच जनरल बॉडी मेंबर वाय. टी.देशमुख, विलासराव जगताप रायगडचे सहाय्यक विभागीय अधिकारी तसेच राजेश गायकर, मुख्याध्यापिका ज्योस्त्ना ठाकूर, राहुल घरत, रवींद्र भोईर, अरुणकुमार भगत, आशाताई भगत, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, शकुंतला ठाकूर उलवे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, माजी मुख्याध्यापिका साधना खटावकर, प्राचार्य निशा नायर मॅडम आदी उपस्थित होते.

याव्यतिरिक्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर तसेच वर्षा प्रशांत ठाकूर, माजी पं.स.सदस्य रत्नप्रभा घरत यांचीदेखील आनंदनीय उपस्थिती या कार्यक्रमास लाभली. या शिवाय एमपीएससी कॉलेजचे प्राचार्य गणेश ठाकूर, बाळासाहेब कारंडे, मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा भविष्यात आपली कार्यक्षमता वृद्धिंगत करावी असा मोलाचा सल्ला आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांच्यातील कलागुणांना अधिकाधिक वाव मिळावा यासाठी विद्यार्थ्यांनी पालकांनी विशेष लक्ष द्यावे तसेच विद्यार्थ्यांना नवनवीन वाटा उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी आपली कौशल्य वाढवावी, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणामध्ये केले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी वर्षभरातील विद्यालयाचा आढावा आपल्या भाषणामध्ये मांडला विद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रगतीचा चढता आलेख त्यांनी उपस्थितांना सांगितला तसेच भविष्यातील काही योजना व उपक्रम यांची माहिती ही उपस्थितनां दिली या कार्यक्रमास दरवर्षीप्रमाणे पालकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजूडकर, नेहा खन्ना, मिनल नाईक आदींचीं उपस्थिती होती. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदीही उत्साहाने सहभागी झाले.

## पनवेलमध्ये संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त पनवेल शहरातील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सभागृहात भव्य उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात समाजातील तरुण पिढीसाठी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. ११ ते १८ वर्षे वयोगटातील कोणताही मुलगा नशामुक्त राहिल्यास, त्याच्या शिक्षणासाठी दरवर्षी, रुपये खर्च श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. समाजातील युवा पिढी शिक्षित होऊन मोठ्या पदांपर्यंत पोहोचावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हाध्यक्ष शिवदास कांबळे, कामोठे शहराचे भाजप शहराध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक विकास घरत, पनवेल शहराचे शहराध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक सुमित झुंजारराव, संस्थापक अध्यक्ष सुरेश डोयरीया, तसेच राजकुमार डोयरीया आदी उपस्थित होते.

उत्सव सोहळ्यात संत रोहिदास महाराजांच्या विचारांचा जागर करण्यात आला. नशामुक्ती, शिक्षण आणि सामाजिक उन्नतीसाठी उचललेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.





पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे यांना वाढदिवसानिमित्त संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सदस्य अॅड. राहुल घरत, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, महात्मा फुले कॉलेजचे प्राचार्य गणेश ठाकूर, माजी नगरसेवक शिवदास कांबळे आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये स्वामी गगनगिरी महाराज पालखीचे आगमन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाशिवरात्रीनिमित्त श्री गगनगिरी सेवक मंडळ दादर यांच्या वतीने स्वामी गगनगिरी महाराज यांच्या मुंबई ते खोपोली येथील योगाश्रमदरम्यान भव्य पदयात्रा आणि पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अध्यात्मिक पदयात्रेदरम्यान गुरुवारी रात्री पालखीचे आगमन पनवेल शहरात झाले.

पालखीच्या स्वागतासाठी शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. हर हर महादेवाच्या गजरात भाविकांनी मोठ्या उत्साहात पालखीचे दर्शन घेतले. या वेळी पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांनी पालखी सोहळ्यात सहभागी होत मनोभावे दर्शन घेतले.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहराध्यक्ष तसेच नवनिर्वाचित नगरसेवक सुमित झुंजारराव यांच्यासह असंख्य भक्तगण उपस्थित होते. पालखी सोहळ्यामुळे पनवेल शहरात अध्यात्मिक उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

मुंबई ते खोपोली योगाश्रमापर्यंत चालणारी ही पदयात्रा श्रद्धा, भक्ती आणि शिस्तीचे प्रतीक ठरत असून, महाशिवरात्रीच्या निमित्ताने शिवभक्तांसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरत आहे.



## संपादकीय

# सत्तापालटातून स्थैर्य?


बांगलादेशातील जनतेने बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीला स्पष्ट बहुमत दिले आहे. त्यामुळे त्या पक्षाचे कार्याध्यक्ष तारिक रहमान पंतप्रधान होतील हे निश्चित आहे. तेथील तरुणांच्या हिंसक आंदोलनानंतर देशातून पलायन करून माजी पंतप्रधान शेख हसीना भारतात राजकीय आश्रित आहेत. तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले आहेत. आता निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तारिक रहमान यांना फोन करून त्यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. बांगलादेशात स्थिर, लोकशाही सरकार स्थापन व्हावे अशी भारताची इच्छा आहे.

**बांगलादेशात गुरुवारी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) ३००पैकी २१२ जागा जिंकून १७ वर्षांनंतर मोठा विजय मिळवला आहे. बीएनपी हा बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचा पक्ष असून सरकार स्थापनेसाठी बांगलादेशात १५१ जागांची आवश्यकता असते. या निवडणुकीने बांगलादेशात निव्वळ सत्तापालट होणार नसून तेथील जनतेने संविधान बदलाच्या बाजूनेही कौल दिला आहे. संविधानबदलातून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी संसदेच्या दुसऱ्या सभागृहाची निर्मिती केली जाईल व पंतप्रधानांचे अधिकार कमी होतील. खालिदा झिया यांचे डिसेंबरअखेरीस निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे व माजी राष्ट्रपती झिया उर रहमान यांचे ज्येष्ठ पुत्र तारिक रहमान यांना त्यांच्या पक्षाचे प्रमुख नेते जाहीर करण्यात आले. तारिक रहमान १७ वर्षे ब्रिटनमध्ये निर्वासित म्हणून राहिले असून निवडणुकीच्या तोंडावर २०२५च्या अखेरीस ते बांगलादेशात परतले. यापूर्वी बांगलादेशात त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही केले गेले. परंतु गेल्या दोन वर्षांत त्यांना या आरोपांमधून मुक्त करण्यात आले. त्यानंतर गेल्या वर्षाच्या अखेरीस ते आजारी खालिदा झियांसोबत राहण्यासाठी मायदेशी परतले. पुनरागमनानंतर त्यांचे जंगी स्वागत झाले व त्यांना बीएनपीचे नेते घोषित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे नेते तारिक रहमान यांना फोन करून विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांच्या शांती, प्रगती आणि समृद्धीसाठी भारत कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार मोदींनी केला. भारत लोकशाहीवादी, प्रगतीशील आणि सर्वसमावेशक बांगलादेशाच्या पाठिशी उभा राहील असेही मोदींनी म्हटले आहे. भारताच्या दृष्टीने बांगलादेशात कुणाचे सरकार येते व त्या सरकारची भूमिका काय हे ईशान्य भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्या देशातील यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये भारताविरोधात 'हस्तक्षेपा'ची तक्रार केली गेली होती. यावेळी मात्र भारताने संपूर्ण निवडणूक प्रक्रियेपासून मुद्दाम अंतर राखले. २०२४मध्ये बांगलादेशात झालेल्या हिंसक आंदोलनात भारताविरोधातील रोष दिसला होता. माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा अवामी लीग हा पक्ष भारताचा पारंपरिक सहकारी राहिला असून आंदोलनानंतर देशातून पलायन केल्यानंतर शेख हसीना भारतात राजकीय आश्रित आहेत. अल्पसंख्याक हिंदू समाज नेहमी अवामी लीगच्या सोबत राहिला आहे. त्या पक्षाला यंदाच्या निवडणुकांमध्ये सहभागी न केल्याबद्दलही भारताने कोणतीही राजनैतिक भूमिका घेतली नाही. दरम्यान, निवडणूक निकालांमध्ये जमात-ए-इस्लामी ७७ जागांसह दुसऱ्या स्थानावर आहे. अवामी लीगवरील बंदीमुळे जमातला पहिल्यांदाच निवडणुकीत एवढे यश मिळाले आहे. १९९१च्या निवडणुकीत जमातने अवघ्या १८ जागा जिंकल्या होत्या. यंदाही जमातच्या प्रचारामध्ये अर्थातच धर्म हाच मुख्य मुद्दा होता. धर्म आणि सोशल मीडियाचा वापर ही जमात-ए-इस्लामीच्या वाढीची मुख्य कारणे सांगितली जातात.**

# गुरू ग्रंथ साहिब : शीख धर्माचा शाश्वत मार्गदर्शक

शीख धर्माचा सर्वात पवित्र आणि सर्वोच्च धर्मग्रंथ म्हणून गुरू ग्रंथ साहिब यांना अद्वितीय स्थान आहे. शीख धर्मात गुरू ग्रंथ साहिब यांना केवळ ग्रंथ मानले जात नाही, तर त्यांना जिवंत गुरूचे स्थान देण्यात आले आहे. मानवाला सत्य, समानता, सेवा आणि ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवणारा हा ग्रंथ संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

गुरू ग्रंथ साहिब यांचे संकलन शीख धर्माचे पाचवे गुरू, श्री गुरू अर्जन देवजी यांनी सन १६०४मध्ये केले. सुरुवातीला या ग्रंथाला 'आदि ग्रंथ' असे संबोधले जात होते. नंतर शीख धर्माचे दहावे गुरू, श्री गुरू गोबिंद सिंगजी यांनी नववे गुरू श्री गुरू तेग बहादुरजी यांच्या वाणीचा समावेश करून या ग्रंथाला अंतिम स्वरूप दिले. सन १७०८मध्ये गुरू गोबिंद सिंगजी यांनी गुरू ग्रंथ साहिब यांना शीख धर्माचा अंतिम आणि



शाश्वत गुरू घोषित केले. त्यानंतर शीख धर्मात कोणताही मानवी गुरू झाला नाही.

गुरू ग्रंथ साहिब हे गुरुमुखी लिपीत लिहिलेले असून त्यात एकूण १४३० अंग (पाने) आहेत. या ग्रंथामध्ये शीख गुरूंच्या वाणीसोबतच संत कबीर, संत नामदेव, संत रविदास, संत शेख फरीद यांसारख्या विविध संतांची शिकवण समाविष्ट आहे. यावरून शीख धर्म हा सर्व धर्मांचा आदर करणारा आणि मानवतेचा संदेश देणारा धर्म असल्याचे स्पष्ट होते. गुरू ग्रंथ साहिबची रचना ३१ रागांमध्ये करण्यात आली असून त्यातील वाणी ही संगीतबद्ध स्वरूपात आहे.

गुरू ग्रंथ साहिबचा मुख्य संदेश म्हणजे 'इक ओंकार' – देव एकच आहे. सर्व मानव समान आहेत आणि जात, धर्म, पंथ किंवा वर्ण यांच्या आधारे कोणताही भेदभाव करू नये, हा या ग्रंथाचा मूलभूत विचार आहे. प्रामाणिकपणे काम करणे (किरत करो), देवाचे स्मरण करणे (नाम जपो) आणि गरजूंना मदत करणे (वंड छको) ही जीवनाची तीन मुख्य तत्त्वे गुरू ग्रंथ साहिबमध्ये सांगितली आहेत. या शिकवणीमुळे मानवाला नैतिक, प्रामाणिक आणि सेवाभावी जीवन जगण्याची प्रेरणा मिळते.

शीख धर्मात गुरू ग्रंथ साहिब यांना गुरूद्वारामध्ये अत्यंत आदराने ठेवले जाते. दररोज सकाळी 'प्रकाश' विधी करून ग्रंथ उघडला जातो आणि रात्री 'सुखासन' विधी करून आदरपूर्वक ठेवला जातो. गुरूद्वारात प्रवेश करताना डोक्यावर रुमाल किंवा पगडी बांधूनच प्रवेश केला जातो, यावरून या ग्रंथाबद्दल असलेला सन्मान आणि श्रद्धा दिसून येते.

गुरू ग्रंथ साहिब हा केवळ शीख धर्माचा ग्रंथ नसून तो संपूर्ण मानवजातीसाठी शांती, प्रेम, समानता आणि बंधुभावाचा संदेश देणारा मार्गदर्शक आहे. या ग्रंथातील शिकवण आजच्या आधुनिक युगातही तितकीच महत्त्वपूर्ण आहे. मानवतेचा संदेश देणारा, सत्याचा मार्ग दाखवणारा आणि जीवनाला योग्य दिशा देणारा गुरू ग्रंथ साहिब हा खऱ्या अर्थाने मानवजातीचा आध्यात्मिक दीपस्तंभ आहे.

**–प्रवीण डोंगरदिवे, उपसंपादक,**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण भवन, नवी मुंबई**

# लंगर सेवा : मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श

भारतीय संस्कृती आणि धर्मपरंपरा विविधतेत एकतेचा संदेश देणारी आहे. या महान परंपरेतील शीख धर्म हा मानवता, समता, सेवा आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा एक प्रभावी धर्म म्हणून ओळखला जातो. शीख धर्माची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जागतिक स्तरावर आदर्श ठरलेली परंपरा म्हणजे लंगर सेवा. लंगर सेवा ही केवळ धार्मिक विधी नसून, ती सामाजिक समतेची, परोपकाराची आणि मानवी करुणेची जिवंत परंपरा आहे.

लंगर सेवेचा ऐतिहासिक उद्गम

लंगर सेवेची संकल्पना शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक देवजी यांनी १५व्या शतकात मांडली. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद आणि सामाजिक विषमता अस्तित्वात होती. गुरू नानक देवजी यांनी या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेला आव्हान देत सर्व मानव समान असल्याचा संदेश दिला. त्यांनी गुरुद्वारामध्ये सर्वांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था सुरू करून समाजातील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

पुढील गुरूंनी लंगर परंपरेला अधिक सुसंगठित आणि व्यापक स्वरूप दिले. विशेषतः गुरू अमरदास जी यांनी 'पंगत' आणि 'संगत' या संकल्पनांचा प्रचार करून लंगर सेवेचा सामाजिक पाया मजबूत केला. गुरुद्वारामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने गुरूंच्या दर्शनापूर्वी लंगरमध्ये बसून भोजन करावे, असा नियम त्यांनी केला. यामुळे समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजात रुजला.

सेवेची तत्त्वज्ञानात्मक संकल्पना

लंगर सेवेचे तत्त्वज्ञान तीन मूलभूत मूल्यांवर आधारीत आहे– समता, सेवा आणि सामूहिकता. शीख धर्मानुसार देव सर्वत्र आहे आणि सर्व मानव देवाचेच अंश आहेत. त्यामुळे मानवांमध्ये भेदभाव करणे म्हणजे देवाच्या इच्छेचा अवमान करणे होय. लंगर सेवेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील लोक एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. राजा असो वा सामान्य नागरिक, श्रीमंत असो वा गरीब, स्त्री असो वा पुरुष–सर्वांसाठी समान आसन आणि समान अन्न दिले जाते.

लंगरमध्ये सेवा करणे हे शीख धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते. अन्न तयार करणे, वाटप करणे, पाणी देणे, भांडी धुणे, स्वच्छता राखणे–हे सर्व कार्य स्वयंसेवक भावनेने केले जाते. या सेवेचे मूळ उद्दिष्ट अहंकाराचा त्याग करून मानवसेवेला सर्वोच्च मानणे हा आहे.

सेवेची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती

लंगर सेवेची कार्यपद्धती अत्यंत सुव्यवस्थित आणि लोकसहभागावर आधारीत आहे. वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

मोफत भोजन व्यवस्था : लंगरमध्ये कोणालाही शुल्क न देता अन्न दिले जाते.

सर्वधर्मसमभाव : कोणत्याही धर्म, जात, भाषा किंवा देशातील व्यक्तीसाठी लंगर खुले आहे.

सामूहिक भोजन पद्धती : सर्वजण जमिनीवर एकाच पंक्तीत बसून भोजन करतात, ज्यामुळे सामाजिक समतेची जाणीव निर्माण होते.

स्वयंसेवी सहभाग : लंगर सेवा स्वयंसेवकांच्या सहभागावर चालते. समाजातील प्रत्येक व्यक्ती सेवा देऊ शकतो.

साधे आणि सात्त्विक अन्न : लंगरमधील भोजन साधे, पोषणमूल्यपूर्ण आणि सात्त्विक असते.

शिस्त आणि स्वच्छता : लंगरमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सामूहिक सहकार्य यांना विशेष महत्त्व दिले जाते.

सेवा आणि सामाजिक परिवर्तन

लंगर सेवा ही केवळ धार्मिक सेवा नसून ती सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. इतिहासात भारतात जातीभेदामुळे समाजात विभाजन होते. लंगरने या विभाजनावर प्रहार करून समानतेचा संदेश दिला. गुरुद्वारामध्ये सर्वजण एकत्र बसून भोजन करतात. त्यामुळे सामाजिक भेदभाव नष्ट होतो आणि बंधुभाव वाढतो.

लंगर सेवा स्त्री–पुरुष समानतेचेही प्रतीक आहे. स्त्रिया आणि पुरुष समान अधिकाराने सेवा करतात. त्यामुळे लिंगभेदाविरुद्ध सामाजिक संदेश दिला जातो. तसेच लंगर सेवा गरीब, गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी आधारस्तंभ ठरते.

**आधुनिक काळातील सेवेचे जागतिक योगदान**

आज लंगर सेवा केवळ भारतापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर मानवतेची सेवा करणारी चळवळ बनली आहे. भारतातील अमृतसर येथील हरमंदिर साहिब (स्वर्ण मंदिर) येथे दररोज लाखो भाविक आणि पर्यटकांना लंगर दिला जातो. हे जगातील सर्वात मोठ्या सामूहिक भोजन व्यवस्थांपैकी एक मानले जाते.

नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप, दुष्काळ, युद्ध किंवा महामारीच्या काळात शीख समाजाने लंगर सेवेच्या माध्यमातून जगभर मानवतेची सेवा केली आहे. कोरोना महामारीच्या काळात भारतासह विविध देशांमध्ये शीख स्वयंसेवकांनी गरजू लोकांना मोफत भोजन पुरवले. ही सेवा मानवतेसाठी प्रेरणादायी ठरली.

सेवेचा आध्यात्मिक, नैतिक संदेश

लंगर सेवा ही केवळ भौतिक अन्नपुरवठा नसून ती आध्यात्मिक शिक्षणाची प्रक्रिया आहे. सेवा करताना अहंकाराचा त्याग, करुणेची भावना आणि मानवतेचा आदर विकसित होतो. शीख धर्मानुसार सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा होय. गुरू ग्रंथ साहिबमध्ये सेवेला अत्यंत महत्त्व देण्यात आले असून, सेवेमुळे मानवाला आत्मिक शांती आणि नैतिक उन्नती प्राप्त होते, असा संदेश दिला आहे.


**–संजीवनी जाधव–पाटील**
**सहाय्यक संचालक (माहिती),**
**कोकण विभाग, नवी मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

### वाय-फाय सारखं बंद पडतंय? हे करा...

महत्त्वाची ऑफिस मीटिंग असो, आवडत्या वेब सीरिजचं स्ट्रीमिंग असो किंवा ऑनलाईन गेमिंगचा थरार; अशा वेळी अचानक वाय-फाय डिस्कनेक्ट झालं की रंगाचा बेरंग होतो. वाय-फाय वारंवार ड्रॉप होणं ही आजच्या डिजिटल युगातील मोठी डोकेदुखी ठरतेय. नेमक्या कोणत्या कारणांमुळे वाय-फाय डिस्कनेक्ट होतं आणि ते कसं दुरुस्त करायचं याच्या काही सोप्या टिप्स...



✻ राऊटरवर वाढलाय 'लोकेशन'चा भार?

जर वाय-फायशी गरजेपेक्षा जास्त उपकरणं कनेक्ट असतील, तर कनेक्टिव्हिटी ड्रॉप होण्याची शक्यता असते. मोबाईल, लॅपटॉप, स्मार्ट टीव्ही आणि घरातील इतर गॅजेट्स जरी डेटा वापरत नसले, तरी ते बँडविड्थ कंज्युम करतात. यामुळे राऊटरवर लोड येतो. त्यामुळे जे डिव्हाईस वापरात नाहीत, त्यांचं वाय-फाय बंद करा. यामुळे इंटरनेटचा स्पीड आणि स्थिरता वाढेल.

✻ राऊटरची जागा चुकली तर नाही ना?

वाय-फाय सिग्नल स्ट्रॉन्ग राहण्यासाठी राऊटरची जागा अत्यंत महत्त्वाची असते. लॅपटॉप किंवा मोबाईल राऊटरपासून खूप लांब असेल किंवा मध्ये भिंतींचा अडथळा असेल, तर कनेक्शन वारंवार तुटू शकतं तसेच राऊटर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या मागे किंवा कोपऱ्यात लपवून ठेवू नका. राऊटर घराच्या मध्यभागी आणि उंचावर ठेवा. ओव्हन, फ्रीज किंवा टिव्हीसारख्या उपकरणांपासून राऊटर लांब ठेवा, कारण त्यांच्या लहरींमुळे सिग्नलमध्ये अडथळा येतो.

✻ राऊटर जुना झालाय का?

तुम्ही सर्व उपाय करूनही जर वाय-फाय डिस्कनेक्ट होत असेल, तर कदाचित तुमच्या राऊटरची एक्सपायरी डेट जवळ आली आहे. जुने राऊटर सध्याच्या हाय-स्पीड इंटरनेट सर्व्हिसेसशी सुसंगत नसतात. ते वारंवार रिसेट करावे लागतात आणि काही वेळानंतर पुन्हा बंद पडतात.

✻ सॉफ्टवेअर अपडेटकडे लक्ष द्या

अनेकदा राऊटरचं फर्मवेअर जुनं झाल्यामुळे तांत्रिक अडचणी येतात. राऊटर मॅन्युफॅक्चरर वेळोवेळी अपडेट्स देत असतात, जे आपण दुर्लक्षित करतो. राऊटरच्या सेटिंगमध्ये जाऊन सॉफ्टवेअर अपडेट आहे का ते तपासा. यामुळे अनेक छोटे बग्स आपोआप दूर होतात.

# मराठी कवयित्री संजीवनी मराठे

विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनींचा जन्म पुण्याचा. शिक्षणही पुण्यातच झाले. महिला विद्यापीठाच्या जीए व एमए पदव्या त्यांनी संपादन केल्या. शाळकरी वयातच त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. या रचनांचा काव्य–संजीवनी (१९३२) हा त्यांचा पहिला संग्रह असला तरी संजीवनींची रसिकांना खरी ओळख झाली ती राका (१९३८) या संग्रहातून (काव्य–संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रत केलेली आहे).



## निमित्त

यानंतरची संजीवनींची कविता संसार (१९४३), छाया (१९४९), चित्रा (१९५७) व चंद्रफुल (१९५१) या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाली आहे. भावपुष्प (१९५१) व परिमला (१९५९) हे त्यांचे गीतसंग्रह. संजीवनी (१९७६) हा त्यांच्या निवडक कवितेचा संपादित संग्रह तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक (१९७६) ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होते.


संजीवनींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरणमंडळाने निर्माण केलेले काव्यगाय नास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून संजीवनींची कविता गेय रूपात अवतरली आणि त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांत्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती तसेच शब्दकळा, आविष्काराचे वळण यांचा संजीवनींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे, मात्र तांब्यांप्रमाणे त्यांची प्रतिभा नाट्यगीतानुकूल नाही तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता, त्याची परंपराही संजीवनींच्या कवितेत पृथगात्य स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वप्निलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता तिच्या अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे' हे गीत याचे उत्कृष्ट प्रातिनिधिक उदाहरण होय.

स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी संजीवनींची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. भाविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची 'एक सानशी कळशी' (छाया)सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेली की, त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते, हे राष्ट्रप्रेमाचा आविष्कार करणाऱ्या त्यांच्या रचनेतून स्पष्ट होते.

संजीवनींच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धता, वात्सल्यादी स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांच्या अनुभवविश्वाला असलेला निरागसतेचा रंग हे त्याचे एक वेधक वैशिष्ट्य आहे. संजीवनींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख आवश्यक आहे. मुलांचे अनुभव प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊन देता अस्सलपणे साकार करण्याचे श्रेय त्यांनी मिळविणे आहे. महाराष्ट्र शासनाने बरं का गं आई (१९६२) व हसू बाई हसू (९१६३) या त्यांच्या संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला आहे.

**–सुधा जोशी**

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## काहीच सुचत नाहीये आणि कशातच रस वाटत नाहीये?

आयुष्यात सगळं काही सुरळीत सुरू असतानाही अचानक रिकामपण वाटणं, कशातच रस न उरणं किंवा काहीच करावंसं न वाटणं, ही आजच्या काळात एक मोठी समस्या आहे. आपण याला 'बोअर' होणं म्हणतो, पण मानसशास्त्रात या स्थितीला खोल अर्थ आहे. इंग्रजीत याला 'Boredom' म्हणतात. पण हे केवळ रिकामपण नसून ते मनाचे एक 'लक्षण' आहे.



१. प्रोत्साहनाचा अभाव : जेव्हा आपल्या मेंदूला नवीन काहीतरी शिकायला मिळत नाही किंवा आव्हाने मिळत नाहीत, तेव्हा तो 'लो मोड'वर जातो.

२. साचेबद्ध आयुष्य : रोज तेच काम, तोच रस्ता आणि तोच दिनक्रम यामुळे मनातील उत्साह संपतो.

३. डिजिटल थकवा : सतत सोशल मीडिया स्क्रोल केल्यामुळे डोक्याला 'डोपामाइन'ची इतकी सवय होते की, साध्या आणि शांत गोष्टी आपल्याला बोअर वाटू लागतात.

४. भावनिक रिक्तता : कधीकधी आपण आपल्या भावना दाबून ठेवतो, ज्यामुळे मन तटस्थ होते आणि कशातच रस उरत नाही.

बोअरडमवर मात करण्यासाठी प्रभावी उपाय

✻ 'काहीच न करण्याचा' आनंद घ्या : मानसशास्त्रज्ञ सांगतात की, बोअर होणं वाईट नाही. जेव्हा तुम्ही काहीच करत नाही, तेव्हा तुमचा मेंदू अधिक 'क्रिएटिव्ह' होतो. फोन बाजूला ठेवा आणि शांत बसा. नवीन कल्पना सुचण्यासाठी ही रिकामी जागा गरजेची असते.

✻ 'मायक्रो–चॅलेंजेस' स्वीकारा : मोठं काहीतरी करण्याऐवजी छोट्या गोष्टी बदला. आज घराचा रस्ता बदला, एखादा नवीन पदार्थ बनवून पहा किंवा कोणा जुन्या मित्राला फोन करा. हे छोटे बदल मेंदूला ताजेतवाने करतात.

✻ स्क्रीनपासून लांब जा : रिकामा वेळ मिळाला की आपण फोन हातात घेतो. त्याऐवजी १५ मिनिटे नुसती निसर्गात फिरा किंवा खिडकीतून बाहेर पहा. यामुळे डोळ्यांना आणि मनाला विश्रांती मिळेल.

✻ छंदाची पुनरावृत्ती करा : लहानपणी तुम्हाला काय करायला आवडायचं? चित्रकला, वाचन की संगीत? पुन्हा एकदा त्या गोष्टीकडे वळा.

✻ शारीरिक हालचाल : कधीकधी शरीरात ऊर्जा नसल्यामुळेही मन मरगळतं. फक्त १० मिनिटांचा व्यायाम किंवा वेगाने चालणेदेखील शरीरातील 'हॅपी हार्मोन्स' वाढवू शकते.

# चौक ग्रामपंचायतीचे पुनर्वापराला प्राधान्य

## ■ नाविन्यपूर्ण 'रितू' उपक्रमाचे भूमिपूजन

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चौक, बिर्ला कार्बन यांच्या माध्यमातून आणि क्राफ्ट यांच्या सौजन्याने विद्यमान थेट सरपंच रितू सुधीर ठोंबरे यांच्या अथक प्रयत्नाने चौक ग्रामपंचायत RITU मॉडेल करीत असून सांडपाण्याचा पुन्हा नाविन्यपूर्ण पुनर्वापर उपक्रम राबविण्यात येणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन सरपंच रितू ठोंबरे यांच्या हस्ते संपन्न झाले.



चौक गावात पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक अनोखे पाऊल टाकत सांडपाणी पुनर्वापराचा आदर्श प्रकल्प उभारला जात आहे. या उपक्रमाचे सर्व श्रेय गावाच्या सरपंच रितू ठोंबरे यांना जात असून RITU - Recycle In Time Utilize ही संकल्पना गावाच्या विकासाचे नवे सूत्र ठरणार आहे.

RITU म्हणजे केवळ नाव नाही तर योग्य वेळी पुनर्वापर करून संसाधनांचा सुयोग्य उपयोग ही विचारसरणी आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. गावातील घरगुती सांडपाणी शुद्धीकरण करून ते झाडांना पाणी देणे, बागायतीसाठी वापरण्याची प्रणाली उभारण्यात येत आहे. जवळपास असणाऱ्या बांधकामासाठी त्याचा वापर केला जाईल. यामुळे दररोज वापरण्यात येणाऱ्या पाण्याची बचत होणार असून गावातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाय आहे.

सरपंच रितू ठोंबरे यांनी ग्राम पंचायत सदस्य, ग्रामस्थ, महिला बचतगट, युवक मंडळे आणि शाळेतील विद्यार्थ्यांना सहभागी करून व्यापक जनजागृती केली आहे. वेळेत पुनर्वापर, भविष्य सुरक्षित हा संदेश देऊन प्रत्येक घरापर्यंत या उपक्रमाची माहिती पोहचवण्यात आली आहे. परिणामी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने प्रकल्प यशस्वी होईल असे सरपंच रितू ठोंबरे आणि ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे गावात स्वच्छता, हरित परिसर आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल. जिल्हा प्रशासनानेही या प्रकल्पाची दखल घेत इतर गावांसाठी RITU मॉडेलचा अभ्यास करण्याचे संकेत दिले आहेत.

सरपंच रितु यांच्या दूरदृष्टीमुळे गावात केवळ पाण्याची बचत नाही तर वेळेवर केलेल्या पुनर्वापराची संस्कृती रुजली जाणार आहे. Recycle In Time Utilize या तत्त्वावर उभा राहणारा हा प्रकल्प ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी ठरेल, पर्यावरणपूरक विकासाचा नवा आदर्श निर्माण होईल असे दिसते.

या वेळी बिर्ला कार्बन कंपनीचे लक्ष्मण मोरे, क्रा कंपनीचे डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी, श्रीधरन, उप सरपंच पूजा हातमोडे, सदस्य निखिल मालुसरे, सुभाष पवार, ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

# कर्मचारी महिलेचा विनयभंग

**खोपोली : प्रतिनिधी**

महिला कर्मचारीला केबिनमध्ये बोलून मनास लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन इमॅजिका वॉटर पार्क रिटेल डिपार्टमेंटचा व्यवस्थापक मनिंदर सिंग चाहल यांनी केल्याची घटना खालापूरात घडली आहे.

खोपोली येथे २५ वर्षीय तरुणी इमॅजिका वॉटरपार्क खालापुर रिटेल डिपार्टमेंट मध्ये सेल व बिलींगचे काम करते. आरोपी मनिंदर हा इमॅजिका वॉटरपार्क खालापुर रिटेल डिपार्टमेंटचा व्यवस्थापक म्हणुन काम करतात. त्याने तिला केबिनमध्ये बोलवून मोबाईल घेवुन मनास लज्ञा उत्पन्न होईल, असे कृत्य करत विनयभंग केला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे मनिंदर चाहल विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe**

Plot No:- 240,241 Sector-24 Pushpak node, Ulwe Tal- Panvel, Dist. - Raigad. Phone: -022-27212031

## Tender Notice

Tenders are invited from the reputed firms/ companies by filling up the form for Tendering process for the Proposed interior work of School admin office & staff room.

The detail information of tender / tender process is available at our school admin office from 16/02/2026. Tender must be submitted to the admin office of Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe, before 21/02/2026 upto 5.00 pm.

| Name of work | Estimated Cost | Blank Tender Cost |
|---|---|---|
| Proposed interior work of School admin office & staff room. | Rs. 10,82,000 /- | Rs. 1,000 /- (non refundable) |

**sd/-**
**Principal,**
**Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe**


# अलिबागमध्ये भजन महोत्सव उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादितचा २६ वा वर्धापनदिन आणि यशस्वी २५ वर्षांची गौरवशाली वाटचाल उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य भजन महोत्सवाला सभासद, ठेवीदार, हितचिंतक आणि भजन रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या भजन महोत्सवात नामवंत कलाकारांनी आपली सुरेल मैफल सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संगीत चक्री भजन जुगलबंदीत गायक कृष्णा देशमुख व वैभव थोरवे यांनी रंगतदार सादरीकरण केले. पखवाज साथ गणेश लोभी व तबला साथ समीर हडप यांनी कार्यक्रमाला भव्यता प्रदान केली.

तसेच श्री गणेश महिला प्रासादिक भजन मंडळ, वेलवली (अलिबाग) यांच्या गायिका जागृती कृष्णा पाटील यांनी पखवाज साथ श्री. सागर जंगम व तबला साथ विजय शिंदे यांच्या सहकार्याने भक्तिरसाची उधळण केली.

गोकुळेश्वर प्रासादिक भजन मंडळ, वेश्वी (अलिबाग) येथील गायक निलेश जंगम तसेच हनुमान प्रासादिक भजन मंडळ, बेलकडे (अलिबाग) येथील गायक अनंत म्हात्रे यांनी पखवाज साथ गणेश पाटील यांच्या सहयोगाने कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढविली.

या भजन महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात माजी जिल्हा सरकारी वकील प्रसाद शांताराम पाटील यांचा मोलाचा सहभाग लाभला. रौप्यमहोत्सवी वर्षात संस्थेने ५० कोटी रुपयांच्या ठेवींचा ऐतिहासिक टप्पा गाठत सहकार क्षेत्रात भक्कम स्थान निर्माण केले आहे. सभासदांना २५ टक्के लाभांश वाटप तसेच ठेवींवर १० टक्के परतावा देऊन संस्थेने सहकार चळवळीत एक आदर्श पायंडा पाडला आहे. आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सभासदकेंद्री धोरण यामुळे संस्थेचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत होत आहे. वर्धापनदिनानिमित्त विविध मान्यवरांनी संस्थेस भेट देऊन शुभेच्छा व अभीष्टचिंतन व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रम भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

संस्थेची प्रगतीची घोडदौड अशीच अविरत सुरू राहील, यासाठी संचालक मंडळ, कर्मचारीवृंद, सभासद आणि हितचिंतक यांचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष योगेश मगर यांनी नमूद केले. भविष्यातही सभासदांच्या विश्वासाला पात्र ठरत अधिक सक्षम व लोकाभिमुख सेवा देण्याचा संकल्प संस्थेने यानिमित्ताने व्यक्त केला आहे.

# झेडपी निवडणुकीदरम्यान खालापुरात एकही गुन्हा नाही!

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस यांनी रायगड जिल्हा परिषद व खालापूर पंचायत समिती निवडणुकीत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अतिशय मेहनत घेतली. या निवडणूक काळात एकाही गुन्ह्याची नोंद झालेली नाही, हे विशेष. कोकण परीक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी या मतदार संघाची प्रत्यक्ष पाहणी करून खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे कौतुक केले.



निवडणुकीत पोलीस बंदोबस्त अत्यंत महत्त्वाचा असतो. खालापूर तालुक्यातील संवेदनशील मतदान केंद्रे, पंचायत समिती कार्यालयाच्या आवारातील मतमोजणी केंद्र आणि खालापूर तालुक्यातील मतदार यांची सुरक्षा त्यांनी केली. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या नेतृत्वाखाली खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी तालुक्यातील कायदा आणि सुव्यवस्था अतिशय योग्य पद्धतीने हाताळताना अतिशय काळजी घेतल्याचे दिसत आहे, खोपोली नगर परिषद निवडणूकनंतर चिघळलेले राजकीय वातावरण तालुक्यात पसरले होते, त्याचा यतकिंचित परिणाम तालुक्यात दिसला नाही, हेच खालापूर पोलिसांचे वैशिष्ट्य आहे.

प्रत्यंक बाबींवर लक्ष ठेवले जात होते. निवडणूक संदर्भातील अधिकारी, कर्मचारी यांना ओळखपत्र वापरूनच निवडणूक प्रक्रियेत सामील करून घेतले होते. मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी पोलीस पेट्रोलिंग व रूट मार्च काढण्यात आला होता. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत चार जिल्हा परिषद गट तर आठ पंचायत समिती गण आहेत. ८४ मतदान केंद्रात मतदान झाले. मतदान दिवशी १३ अधिकारी व १३७ अंमलदार तर मत मोजणी दिवशी २४ अधिकारी आणि १५३ अंमलदार यांनी १ SRPF प्लॅटुन बरोबर चोख बंदोबस्त ठेवला होता. तालुक्यात ७ पेट्रोलिंग सेक्टर तयार करण्यात आले होते. खानाव व सावरोली ही संवेदनशील केंद्रे आहेत.

अधिकृत उमेदवार यांच्यावर केलेली प्रतिबंधक कारवाई, तालुक्यात पोलीस परिणामक गस्त, गाव पोलीस पाटील, उमेदवार यांच्या बैठक, काढलेला रूटमार्च याचा परिणाम शांततेत झाल्याचे दिसून येते. आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचे कुठेही दिसले नाही. गुन्ह्याची नोंद न होणे हीच खालापूर पोलिसांची मोठी कामगिरी आहे, ही बाब कौतुक करण्यासारखी आहे. मत मोजणी दिवशी खालापूर पोलिसांकडून खाण्यासाठी केळी व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले होते.


## जाहिर नोटीस

आमचे अशिल यांनी सांगीतल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, श्री. विष्णू विठ्ठल गायकवाड यांच्या मालकीची मौजे–नांदगांव, ता. पनवेल, जि. रायगड. येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**–: मिळकतीचे वर्णन :–**
**मौजे नांदगांव, ता. पनवेल, जि. रायगड**

| गांव | स. नं. | हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| नांदगांव, ता. पनवेल | ४१ | ६ | ०–०४–० | ०.१६ |
| वर नमुद मिळकतीपैकी दूसरेपक्षी यांचे हिश्याचे मिळकतीचे खरेदी व्यवहार | | | ०–०३–६८ | ०.१५ |

वर वर्णन केलेली मिळकत कायमस्वरुपी विक्री करण्यात येणार आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विकी, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तकारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल.**
**दिनांक :– १३/०२/२०२६.**

**सही/–**
**ॲड. सुप्रिया एस पाटील**
**पत्ता :– ऑफिस क्र.०१. पहिला मजला यशोकीरण सो. पनवेल ४१०२०६**


# मासेमारी करताना जाळ्यात अडकलेल्या कासवाला जीवदान

**मुरूड : प्रतिनिधी**

कासव हा जलचर प्राणी असून खोल समुद्रात नेहमीच दुर्मिळ कासव आढळून येतात. मोठ मोठ्या जहाजांची पंखा लागून काही कासव हा दुर्घटग्रस्त होऊन त्याचा मृत्यू होत असतो, परंतु मासेमारी करताना बरेचशे मच्छीमार जाळ्यात अडकलेल्या कासव या जलचर प्राण्यास जीवनदान देत असतात.

ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे, एकत्रितपणे अंडी घालण्याच्या पद्धतीने यांना हे नाव मिळाले आहे. ग्रीन टर्टल हे कासव पोट गुळगुळीत, पाठ टणक, पिवळट पांढरा रंग. हॉक्स बिल टर्टल हे कासव चोचीसारखे तोंड, छोट्या आकाराची कासवांची जात असते. मासेमारी करताना या मच्छीमारांना ग्रीन टर्टल जातीचे कासव आढळून आले आहे. हे कासव दुर्मीळ प्रजातीचे असून याचे वास्तव्य खोल समुद्रात असते.



बाळु हरी भिकारी वाशी हावेली आपली बोट क्रमांक आयएन डीएमएच ३– एमएम १७२३ ही दोन सिलेंडरची बोट घेऊन आपल्या खलाशी–भालचंद्र खानजी, खलाशी हरी भिकारी यांना घेऊन मच्छी पकडण्यासाठी आगरदांडा दिघी बंदराजवळील समुद्रात आले असता त्या ठिकाणी मच्छिमारी करताना जाळ्यात अडकलेल्या अंदाजे २५ किलो वजनाचा महाकाय कासवाला पहिले होडीत घेऊन जाळ्यातून त्याची प्रथम सुटका केली आणि पुन्हा समुद्रात सोडण्यात आले.

या वेळी बाळु भिकारी यांनी सांगितले की, समुद्रातील कासवे खाडीमध्ये शेवाळ या खाद्यासाठी येतात आज ही आमच्या पापलेट पकडणारी जाळीत महाकाय कासव सापडला त्या जाळीतुन काढताना जाळीचे फार नुकसान होते. हा साधारण आडीच फूट लांबीचे व दिड फूट रुंदीचे असावा. याला जाळीतुन सुखरूप बाहेर काढुन पुन्हा समुद्रात सोडण्यात आले, असे या वेळी नाखवा बाळु भिकारी यांनी सांगितले.


## कुळगांव बदलापूर नगर परिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन–४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :– coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाईट :– http://kbmc.gov.in

जा.क्र. कुबनप/जाहिरात/३९५/२०२५–२६ दिनांक :– १३/०२/२०२६

**फेर ई-निविदा सूचना ०३ क्र. ०१/२०२५-२६**

कुळगाव बदलापुर नगरपरिषद हद्दीत नगरपरिषदेच्या मालकीच्या क्षेत्रात ०३ वर्षाकरीता जाहिरात फलक उभारणे व जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी हक्क देणे या कामी ठेकेदार / एजन्सी यांची नेमणुक करणे या कामाची जाहिर ई – निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा सूचना नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०९/०२/२०२६ सकाळी ११:०० ते दि. १८/०२/२०२६ दुपारी २:०० पर्यत राहील. दि. २०/०२/२०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता अथवा अन्य सोईच्या दिवशी सदर ई – निविदा उघडण्यात येईल. प्राप्त निविदांपैकी कोणातीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा तसेच नियम व अटी–शर्ती मध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगर परिषद यांनी राखून ठेवला आहे. तसेच लिलावाच्या संबधित अधिक माहिती आणि अटीशर्ती बाबत माहिती करीता जाहिरात विभागात तसेच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/–**
**(मारुती गायकवाड)**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगाव



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors/Contractors of MSETCL for following SRM E-tender,

| RFx No. | E-Enquiry No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000038868 | EE/400kV/RS (O&M)/DN/KHR/Enq-3 /2025-26 | Hiring of Cranes/Hydra and JCB for the work of replacement of CB, Bushing, CVT, CT, Isolators and other miscellaneous work at 400kV RS Kharghar under 400kV RS O&M Dn., Kharghar. | Rs. 5.82 Lakhs (incl. GST) | Rs. 5819.59 | Rs 590/- (incl. GST) |

**Sale period:** 13.02.2026 to 28.02.2026, **Last Date of Submission:** 28.02.2026 up to 23:59 Hrs,
**Date of opening (Tech. bid):** 02.03.2026 at 10:30 Hrs (if possible).
**Contact person:** Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar. (Contact No.9167006557)
For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer, (I/C)**
**400kV RS O&M Dn., Kharghar**



## जाहिर नोटीस

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पनवेल, जि. रायगडं, यांचे समोर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

श्री कुलस्वामी को ऑप. केडीट सोसायटी लि. या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकित कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबन अंतिम सुनावणी दि.२३/०२/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनीधी मार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केल्या जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १) | ३७५/२०२५–२०२६ | १) श्री. हिरामन बबन घायतडके | फ्लॅट नं बी–९०४, नववा मजला, श्रीराम आर्केड, प्लॉट ३०/३१/३२, सेक्टर–२० कामोठे ४१०२०६. | ७२,७८५/– |
| | | २) श्री कृष्णा भास्कर मोढवे | माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि. डॉकयाड रोड, माझगाव, मुंबई ४०००१० | |
| | | ३) श्री. प्रदिप विलास महाडीक | शिवशक्ती सेवासंघ, न्यु गौतम नगर, प्लॉट नं ४, हनुमान मंदिराजवळ गोंवडी, मुंबई ४०००४३. | |
| २) | ३७६/२०२५–२०२६ | १) श्री. प्रदिप विलास महाडीक | शिवशक्ती सेवासंघ, न्यु गौतम नगर, प्लॉट नं ४, हनुमान मंदिराजवळ गोंवडी, मुंबई ४०००४३. | ७२,७८५/– |
| | | २) श्री कृष्णा भास्कर मोढवे | माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि. डॉकयाड रोड, माझगाव, मुंबई ४०००१० | |
| | | ३) श्री संदीप अंनत कदम | एन.एल.२/१६/ अे–५ शिवाजी चौक सेक्टर–१, नेरुळ, ४००७०६ | |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.

**स्थळ : पनवेल.**
**दिनांक :– १३/०२/२०२६.**
**जा.क्र. ३१७/२०२६**

**सही/–**
**(श्रीम. भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड.**

# नवी मुंबई पोलिसांची आता तिसरी नजर

## ४३० बॉडी वॉर्न कॅमेरे आणि गाड्यांना डॅश कॅम

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक पारदर्शक आणि हायटेक करण्यासाठी नवी मुंबई पोलीस दलाने कंबर कसली आहे. वाहतूक पोलिसांच्या अंगावर आता बॉडी वॉर्न कॅमेरे दिसणार असून, पोलीस वाहने देखील आता डॅश कॅमने सज्ज होणार आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे कर्तव्यावर असलेल्या पोलिसांच्या कामात अचूकता तर येईलच शिवाय वाहन धारकांशी होणारे वाद आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारींनाही लगाम बसणार आहे.



पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती दिली असून, या प्रकल्पासाठी निधीची तरतूद आणि अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. वाहतूक विभागाला अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) ठाणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. यात एकूण ४३० बॉडी वॉर्न कॅमेर्‍यांचा प्रस्ताव असून त्यासाठी १.९७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. पहिल्या टप्प्यात ९८.८ लाख रुपये वितरित झाले असून, २३० कॅमेर्‍यांच्या खरेदीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. त्याचप्रमाणे पोलीस वाहनांसाठी १०० डॅश कॅमेर्‍यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत मंत्रालयाकडून तांत्रिक मान्यतेची प्रक्रिया सुरू असून, या कॅमेर्‍यांच्या चाचण्या प्रगतीपथावर आहेत.

अनेकदा वाहतूक नियम मोडल्यावरुन पोलीस आणि नागरिक यांच्यात खटके उडतात. अशा वेळी बॉडी वॉर्न कॅमेरा हा ठोस पुरावा म्हणून काम करेल. तसेच, पोलीस वाहनांवरील डॅश कॅमेर्‍यांमुळे रस्ते अपघात किंवा गुन्हेगारी घटनांचे थेट चित्रीकरण उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पारदर्शकता वाढणार असून गुन्हेगारीला चाप बसणार आहे. त्याचप्रमाणे पोलिसांवरील खोटया आरोपांना आळा बसेल. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्‍यांवर कडक नजर राहील. तसेच डिजिटल पुराव्यांमुळे न्यायालयीन प्रक्रियेत मदत होणार आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर करून पोलीस दलाला अधिक कार्यक्षम बनवणे हा आमचा उद्देश आहे. बॉडी वॉर्न कॅमेर्‍यांमुळे पोलिसांच्या कामकाजात पारदर्शकता येईल आणि डॅश कॅमेर्‍यांमुळे गस्ती दरम्यानच्या घटनांचे अचूक दस्तऐवजीकरण होईल. यामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वासार्हता अधिक वाढेल.**
**-मिलिंद भारंबे,**
पोलीस आयुक्त, नवी मुंबई

# नेरूळ ते सीएसटी लोकल सुरू करण्याची मागणी

## नगरसेवकांचे मंत्री गणेश नाईकांना निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथे आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात नेरुळ येथील सर्व नगरसेवक व नगरसेविकांनी महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेतली. या वेळी नवी मुंबईतील नेरुळ रेल्वे स्थानकासंदर्भात महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या.



नेरूळ स्थानकावरून सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत सी.एस.टी./वडाळा रेल्वे स्थानकाकडे जाणार्‍या लोकलची नवीन फेरी सुरू करण्यात यावी, तसेच नेरूळ रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी एक्सेलेटर (सरकते जिने) सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागासोबत मंत्रालयात लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल आणि आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री गणेश नाईक यांनी या वेळी दिले.

# लिमये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची युसूफ मेहरअली केंद्रात अभ्यासभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कलंबोली, नवी मुंबई येथील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत राबविण्यात येणार्‍या कम्युनिटी एंगेजमनेट प्रोग्राम अंतर्गत विद्यार्थ्यांची युसूफ मेहरअली केंद्र, तारा येथे नुकतीच अभ्यासभेट आयोजित करण्यात आली होती. या अभ्यासभेटीत सीईपीचे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या अभ्यासभेटीला मार्गदर्शन युसूफ मेहरअली केंद्राचे समन्वयक बाळकृष्ण सावंत, रामदास गुरमे, हरिष वाघे यांनी केले. युसूफ मेहरअली केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण विकास, सामाजिक चळवळी, राष्ट्रनिर्मितीतील योगदान व समाजसेवेचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्यक्ष अनुभवातून समाजाशी जोडले जाण्याची संधी मिळाल्याने ही अभ्यासभेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक ठरली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.पी. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रमासाठी आयक्यूएसी समन्वयक बी.बी. जाधव यांनी सीइपीच्या आनुषंगाने महत्त्व सांगून मार्गदर्शन केले तसेच वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. अंकिता जाधव व प्रा. मैथिली सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.



# कोन ग्रामपंचायतीत नवीन कचरा घंटागाडीचे लोकार्पण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत कोन यांच्यावतीने गावातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने खरेदी करण्यात आलेल्या नवीन कचरा गाडीचे लोकार्पण गुरुवारी, १२ रोजी दुपारी उत्साहात पार पडले. नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांच्या हस्ते व ग्रामस्थांच्या साक्षीने हा सोहळा झाला.



ग्रामपंचायत कार्यालयासमोर आयोजित कार्यक्रमास सरपंच अश्विनी जितेश शिसवे,उपसरपंच निकिता आदेश घरत, माजी उपसरपंच सविता कैलास म्हात्रे, सदस्य दिपक धाया म्हात्रे, अक्षय मारुती घरत, साहिल बाबुराव म्हात्रे, धनराज नामदेव बडे, सदस्या निता नितिन म्हात्रे, अस्मिता अमित गायकर, संजय जाधव, ताईबाई बाळकृष्ण पाटील, अंजनी अनंत पाटील, ग्रामसेवक रमेश तारेकर यांच्यासह माजी उपसरपंच जितेश बाळाराम शिसवे, वाहतूक विभाग अध्यक्ष अतुल मारुती घरत, कैलास गोपाळ म्हात्रे, नितीन नथू म्हात्रे, आदेश नारायण घरत, संतोष रामदास गाताडे, मारुती नामदेव घरत, आनंद कोंडिलकर, विनायक नारायण शिसवे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावातील घरोघरी निर्माण होणारा ओला व सुका कचरा वेळेवर व योग्य पद्धतीने संकलित व्हावा, गाव स्वच्छ, सुंदर व निरोगी राहावे, या उद्देशाने ही नवीन गाडी खरेदी करण्यात आली आहे. स्वच्छ गाव – सुंदर गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे संयुक्त सहकार्य आवश्यक असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. ग्रामस्थांनी ओला व सुका कचरा वेगळा करून देण्याचे आवाहन करण्यात आले. सूत्रसंचालन अशोक घरत यांनी केले.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमांतर्गत गुरुद्वारांमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन तसेच राज्यस्तरीय समागम समिती व पनवेल महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमानातून हिंद-दी-चादर – श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या अनुषंगाने नागरिकांसाठी मोफत महा आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन १४ फेब्रुवारी रोजी खारघर व १५ फेब्रुवारी रोजी कळंबोली व नवीन पनवेल येथील गुरुद्वारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या मोफत महा आरोग्य तपासणी शिबिरांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

या मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरामध्ये जनरल तपासणी, गरोदर स्त्रियांची तपासणी, ज्येष्ठ नागरिक तपासणी, लहान मुलांची तपासणी, किशोरवयीन मुलांमुलींची तपासणी, टीबी, लेप्रसी, स्वाईन फल्यू, रक्त तपासणी अशा विविध आरोग्य तपासणीसह तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांवरील तपासणी, मार्गदर्शन व वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे.

शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ – खारघर गुरुद्वारा, रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ – कळंबोली गुरुद्वारा व नवीन पनवेल गुरुद्वारा या ठिकाणांवर वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ४.०० या मोफत महा आरोग्य शिबिरांचा लाभ घेण्यासाठी पनवेल व परिसरातील अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# रसायनी पिल्लईत पीएमश्री शाळांसाठी प्रादेशिक नवोपक्रम मार्गदर्शन शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (स्वायत्त) येथे पीएम श्री शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय प्रादेशिक नवोपक्रम मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



हे शिबिर शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (AICTE) आणि शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल (MIC) यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच वाधवानी फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते.या शिबिराचा मुख्य उद्देश शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे हा होता. या कार्यक्रमाचे राज्यस्तरीय उद्घाटन शिक्षण विभागाच्या संचालिका भावना राजनूर, मयूर बोरकर (प्रादेशिक समन्वयक, MIC-AICTE), मकरंद वेलणकर (तज्ज्ञ, वाधवानी फाउंडेशन) आणि हे जेअंजली नाईक (तज्ज्ञ, वाधवानी फाउंडेशन) यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश डब्ल्यू. बकल यांच्या नेतृत्वाखाली तसेच डॉ. गजेंद्र व्ही. पाटील (नोडल समन्वयक व प्राध्यापक-विभागप्रमुख, यांत्रिकी अभियांत्रिकी) यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई (अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, चएड समूह), डॉ. डॅफ्नी पिल्लई (सचिव), डॉ. प्रियम पिल्लई (COO) आणि फ्रनव पिल्लई (उपमुख्य कार्यकारी अधिकारी व कोषाध्यक्ष) यांचा विशेष सहभाग होता. या शिबिरात १७० हून अधिक शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे AICTE चे उपाध्यक्ष डॉ. अजय जेरे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. डॉ. अजय जेरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या कल्पनांना मौल्यवान मार्गदर्शन व प्रेरणा दिली.

# लोकसहभागातून नवी मुंबईत स्वच्छता उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे स्मरण करीत विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून १० ते २५ फेब्रुवारी दरम्यान नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १२४ विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यास सुरूवात झालेली आहे.

याचप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फतही हिंद-दी-चादर निमित्त विशेष स्वच्छता मोहीमा ठिकठिकाणी राबविल्या जात आहेत. या अंतर्गत आज बेलापूर, नेरूळ, वाशी, कोपरखैरणे, घणसोली विभाग कार्यालय क्षेत्रात सखोल स्वच्छता मोहीमा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली व्यापक लोकसहभागातून राबविण्यात आल्या.

यामध्ये, गुरुद्वारा सेक्टर ८ सिबीडी बेलापूर समोरील परिसरात लोकसहभागातून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अशाच प्रकारे गुरूव्दारा सेक्टर १९ नेरूळ परिसर आणि कोपरखैरणे गुरूव्दारा परिसर या ठिकाणीही सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या.

सायन-पनवेल हायवेवर परिवहन बस थांबा परिसरात रात्रंदिवस मोठ्या प्रमाणात वर्दळ असते हे लक्षात घेत त्याठिकाणी लोकसहभागातून विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये महानगरपालिकेचे स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांच्यासह स्वच्छताकर्मी तसेच टिळक कॉलेजचे एनएसएस विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोहीमेत एक डंपर कचरा संकलित करून घनकचरा प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.




# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळ

## 'मेडिकव्हर'मध्ये भारतनिर्मित मायक्लिपद्वारे शस्त्रक्रियेविना यशस्वी उपचार

**पनवेल : वार्ताहर**

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल येथे पहिल्यांदाच मायक्लिप ही अत्याधुनिक हृदय उपचार प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या उपचारामुळे अत्यंत धोकादायक स्थितीत असलेल्या एका हृदय रुग्णाचे प्राण वाचले आणि ओपन-हार्ट शस्त्रक्रिया टाळणे शक्य झाले.



एका ५५ वर्षीय रुग्णाला काही दिवसांपासूनच छातीत वेदना होणे आणि श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला होता. तपासणीत त्यांच्या हृदयाच्या झडपेत (मिट्रल वाल्व) मोठ्या प्रमाणात गुंतागुंत असल्याचे आढळले. तसेच हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता खूपच कमी झाली होती. याआधी २०१९ मध्ये त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया झाली झाल्याने पुन्हा ओपन-हार्ट सर्जरी करणे अतिशय धोकादायक होते.


या गंभीर परिस्थितीत मेडिकव्हर हॉस्पिटलच्या हृदयतज्ज्ञांच्या टीमने शस्त्रक्रियेऐवजी कॅथेटरद्वारे उपचार करण्याचा निर्णय घेतला. प्रथम हृदयाला रक्तपुरवठा सुरळीत करण्यासाठी अँजिओप्लास्टी करण्यात आली. त्यानंतर मायक्लिप प्रक्रियेच्या मदतीने हृदयाची झडप बंद करण्यात आली. यासाठी दोन मायक्लिप्स बसवण्यात आल्या.

ही प्रक्रिया सुमारे दोन तासांत पूर्ण झाली. उपचारानंतर रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. ही प्रक्रिया करणारे वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. अनुप महाजनी म्हणाले की, अशा उच्च-जोखमीच्या रुग्णांसाठी मायक्लिपसारखे उपचार वरदान ठरत आहेत. या प्रकरणात वेळीच उपचार मिळाल्यामुळे रुग्णाचे प्राण वाचविणे शक्य झाले.

# गजानन चौलकर यांना पुरस्कार जाहीर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील कुंभार समाजाचे आधारवड तथा प्रसिद्ध मूर्तिकार व चित्रकार गजानन शांताराम चौलकर यांना नवी मुंबई कुंभार समाज मंडळाच्या वतीने, यंदाचा प्रतिष्ठेचा व मानाचा समजला जाणारा जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला असून, येत्या १ मार्च रोजी नवी मुंबई कुंभार समाज संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून, त्यांना हा नवी मुंबई वाशी येथील सेक्टर ९ येथील तामिळ संघ हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते समारंभ पूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती अध्यक्ष मोहन कुंभार व कार्याध्यक्ष संतोष चौलकर यांनी दिली.



या समारंभास महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक माजी खासदार संजीव नाईक, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर यांच्यासह महापौर, उपमहापौर, नगरसेवक व अन्य मान्यवर उपस्थितीत राहणार असून, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रसिद्ध मूर्तिकार गजानन चौलकर यांना पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



**पनवेल : शाम हरिश्चंद्र घरत, चंद्रभागा शाम घरत यांच्या वडघर येथील नवीन घराच्या वास्तूशांतीनिमित्त उपस्थित माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेविका दर्शना भोईर आदी.**




**पनवेल : श्री क्षेत्र आई टाकेदेवी दर्शन आणि आई एकवीरा देवीच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर तसेच उज्ज्वला कडू, तन्मयी घरत, भूपेश कडू आणि कियारा (कुहु) घरत, नंदा ठाकूर, कल्पना ठाकूर, रजनी ठाकूर, लता ठाकूर, शुभांगी कडु, आशा म्हात्रे, किशोर ठाकूर, मंजुळा कडु आदी उपस्थित होते.**

# ओल्या काजुगराच्या हंगामाला सुरुवात

## ◆ खवय्यांची खरेदीसाठी लगबग; भाव मात्र चढा







**पाली : प्रतिनिधी**

ओले काजुगर म्हंटले की सगळ्यांच्याच जिभेला पाणी सुटते. काजूचे फळ तयार होण्यापूर्वी येणाऱ्या बी मधील गर काढून भाजी करुन खाल्ली जाते. सध्या या ओल्या काजुगराच्या हंगामास सुरुवात झाली आहे. आदिवासी महिला हा रानचा मेवा विकायला घेऊन येत आहेत. तब्बल ३०० ते ४०० रुपये शेकड्याने सध्या काजूगर मिळत आहेत तेही ठराविक ठिकाणीच. तरीही खरेदीसाठी खवय्ये लगबग करत आहेत.

जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्याने नटलेला डोंगराळ भाग व जंगलामध्ये काजूची झाडे विपुल प्रमाणात आहेत तसेच अनेक बागायतदारांच्या स्वतःच्या खासगी काजूच्या बागादेखील आहेत. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून या झाडांवर काजूच्या बिया येऊ लागल्या आहेत आणि या काजूच्या बिया तोडून त्यातील काजूगर काढून आदिवासी महिला बाजारात विकण्यासाठी घेऊन येत आहेत.

काजुगराच्या हंगामाची नुकतीच सुरुवात झाली असल्याने त्या मुबलक प्रमाणात उपलब्ध नाहीत. परिणामी त्यांचा भाव मात्र चढला आहे.

माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा आदी ठिकाणी या बिया शेकड्याने मिळतात, तर पाली, रोहा, पेण आदी ठिकाणी या बिया वाट्यावर मिळतात. मध्यम आकाराचा वाटा पन्नास रुपये इतका आहे. ज्यामध्ये १० काजुगर उभे कापून ठेवलेले असतात. भाव जास्त असला तरी खवय्ये मात्र चढ्या भावानेदेखील काजुच्या बिया खरेदी करत आहेत. साधारण महिन्याभरानंतर उत्पादन वाढल्यावर काजुगर मुबलक उपलब्ध होतील. त्यामुळे त्यांचा भावदेखील हळूहळु उतरेल.

जून महिन्यापर्यंत ओल्या काजुगराचा हंगाम सुरु असतो. येथे येणारे पर्यटक काजूगराचे पदार्थ मोठ्या आवडीने खातात व विकत घेऊनदेखील जातात. काजुगर विकून विकून आदिवासींच्या हाती चांगले पैसेदेखील मिळतात.

### चविष्ट व स्वादिष्ट

*चविष्ट काजुगर वेगवेगळ्या प्रकारे खाल्या जातात. काजुगराचा रस्सा किंवा सुकी भाजी करुन खाल्ली जाते. पुलाव व बिर्याणीदेखील केली जाते तसेच मटण, मच्छी, व सुक्या मासळीमध्ये टाकूनसुद्धा खाल्ले जातात. असे हे चविष्ट आणि स्वादिष्ट काजुगर जेवणाची लज्जत वाढवितात.*

### आदिवासींची मेहनत

*दुर्गम, डोंगराळ भागात आणि जंगलात काजुगर काढण्यासाठी जावे लागते. आदिवासी बांधव अनवाणी उन्हातान्हात काजुगर काढण्यासाठी जातात. या काजुगराच्या बियांना मोठ्या प्रमाणात चिक असतो. आदिवासी बांधव या बिया काढताना तसेच कापताना हातात मोजे घालत नाही किंवा कोणतीही सुरक्षितता घेत नाही. त्यामुळे त्यांचे हात चिकामुळे पूर्णपणे खराब होतात. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये आदिवासींना बिया काढून विकाव्या लागतात. शासनाकडून त्यांना हातमोजे देणे तसेच सहाय्य करणे गरजेचे आहे.*

ओल्या काजूगरांना काढताना

**खूप त्रास होतो. सध्या हंगामाला नुकतीच सुरुवात झाली आहे. त्यामुळे ओल्या काजूगरांना किंमत चांगली मिळत आहे. काही दिवसांनी मुबलक प्रमाणात काजूगर येतील तेव्हा किमती कमी होतील. स्थानिक ग्राहक आणि पर्यटकांमुळे चांगला व्यवसाय होतो.**

**–पार्वती वाघमारे, काजूगर विक्रेती, श्रीवर्धन**

**आदिवासी लोकांच्या हक्कांचा व्यवसाय काजूगर विक्री हा आहे. या व्यवसायात प्रचंड मेहनत आहे. सध्या वणवा आणि वृक्षतोडीमुळे जंगलातील काजूच्या झाडांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम झाल्याने आदिवासी चिंतातूर आहेत. शासनाने आदिवासींच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.**

**–ॲड. रमेश पवार, आदिवासी नेते, सुधागड**

# रोहा पं.स. सभापतीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार?

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाचे सहा सदस्य निवडून आले आहेत त्यामुळे रोहा पंचायत समिती राष्ट्रवादीच्या ताब्यात आली असून पुढील सभापती दाच्या व उपसभापतीपदाच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. सभापती व उपसभापती माळ कोणाच्या गळ्यात पडणार याबाबत तर्कवितर्क चर्चेला जात आहेत.

मागील कारकिर्दीत रोहा पंचायत समिती राष्ट्रवादीच्या ताब्यात असली तरी रोहा पंचायत समितीच्या मागील निवडणुकीत (२०१७) पक्षीय स्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने स्पष्ट वर्चस्व मिळवले होते. एकूण आठ सदस्यांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचे तब्बल पाच सदस्य विजयी झाले होते. काँग्रेस, शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली होती.

मागील निवडणुकीत खांब, अंबेवाडी, धाटाव, वरसे आणि विरजोली या गणांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले होते, तर नागोठणे येथे काँग्रेसचा उमेदवार, ऐनघर येथे शिवसेनेचा उमेदवार आणि खारगाव येथे शेतकरी कामगार पक्षाचा उमेदवार विजयी झाला होता.

या वर्षीच्या २०२६च्या निवडणुकीत यावेळी राष्ट्रवादी (अजित पवार गट) एक जागा वाढून सहा जागांवर पक्षाने विजय मिळवला आहे. उर्वरित एका जागेवर शिवसेना (उबाठा) व शिवसेना (शिंदे गट) जागा मिळाली आहे. एकाहाती सत्ता राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाकडे आली आहे.

यावर्षी निवडून आलेल्या पंचायत समिती सदस्यांमध्ये नागोठणे पंचायत समिती गण समृध्दी संतोष कोळी राष्ट्रवादी (अजित पवार गट), सुकेळी पंचायत समिती गण अरुणा जानू हंबीर शिवसेना (उबाठा), कोलाड पंचायत समिती गण जगन्नाथ गजानन धनावडे राष्ट्रवादी (अजित पवार गट), आंबेवाडी पंचायत समिती गण संजय संभाजी मांडलुस्कर राष्ट्रवादी (अजित पवार गट), धाटाव पंचायत समिती गण विजया विनोद पाशिलकर राष्ट्रवादी (अजित पवार गट), भुवनेश्वर पंचायत समिती गण सुरेश धोंडु मगर राष्ट्रवादी (अजित पवार गट), न्हावे पंचायत समिती गण वर्षा हेमंत देशमुख शिवसेना (शिंदे गट) घोसाळे पंचायत समिती गण किसन गणपत मोरे राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचा समावेश आहे.

पंचायत समिती सभापतीचपदाचे आरक्षण महिला असल्याने विजया पाशिलकर, समृद्धी कोळी यामधील एका उमेदवाराच्या काळात सभापती पदाची माळ पडण्याची शक्यता आहे. उपसभापतीपदाची माळ सुरेश मगर, संजय मांडलुस्कर, जगन्नाथ धनावडे यापैकी एकाला मिळण्याची शक्यता आहे. खासदार सुनील तटकरे कोणाला पसंती देतात यावर रोहा पंचायत समितीचे सभापती व उपसभापती ठरणार आहेत.

# साळाव–तळेखार रस्ता नूतनीकरण लवकर व्हावे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव ते तळेखार रस्ता नूतनीकरणास विलंब होत असून गेले एक वर्षभर सुरू असलेले रस्ता नूतनीकरणाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे स्थानिक ग्रामस्थांना अपेक्षित होते, परंतु अद्याप या रस्ताचे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले नसून ते लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या वतीने नव्याने करण्यात येत असलेल्या रेवदंडा ब्रिज ते साळावपासून तळेखार हा एम.एच. ९२ मीटरचा रस्ता रूंदीकरण, काँक्रीटीकरण व नूतनीकरण होत आहे. हे काम पावसाळयापूर्वीच प्रवासीवर्ग व स्थानिक ग्रामस्थांना अपेक्षित होते, पण अद्याप हे काम पूर्ण झालेले नाही.

मुरूड तालुक्यातील साळाव ते तळेखार रस्ता रूंदीकरण, काँक्रीटीकरण व नूतनीकरणाचे काम अद्याप सुरू आहे. त्यामुळे ठिकठिकाणी रस्ता अपूर्ण असल्याने व काम सुरू असल्याने प्रवासीवर्ग, वाहने यांना त्रासदायक ठरत आहे. रस्ता नुतनीकरणाचे काम लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी स्थानिक व प्रवासीवर्ग करत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या वतीने नव्याने करण्यात येत आहे. या रस्त्यासाठी १७१ कोटी रूपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

# क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे कुलसंमेलन वडघरला

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्रातील कदम घराण्याचे आठवे भव्य राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन या वर्षी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर मधील वडघर बुद्रुक याठिकाणी शनिवार २१ फेब्रुवारी आणि रविवार २२ फेब्रुवारी या दिवशी आयोजित करण्यात आले आहे. कुलसंमेलनाचे उदघाटनाला माजी पर्यावरण मंत्री रामदासभाई कदम उपस्थित राहणार आहेत.

प्राचीन कदंब राजवंशाचा इतिहास समाजाला कळावा तसेच राज्यभरातील कदम कुटुंबियांना नोकरी व्यवसायात सहकार्य मिळावे, घराण्यातील नामवंतांचा सन्मान करणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून क्षत्रिय मराठा कदम परिवार या संस्थेने आजतागायत सात राज्यस्तरीय कुलसंमेलनांचे आयोजन केले आहेत. यंदाचे आठवे राज्यस्तरीय कुलसंमेलन ऐतिहासिक कांगोरीगडाच्या पायथ्याशी वसलेल्या वडघर बुद्रुक या गावामध्ये २१ व २२ फेब्रुवारी रोजी होणार असून महाराष्ट्रासह गोवा, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि इतर राज्यातूनही मान्यवर संमेलनात उपस्थित राहणार आहेत.

व्यवसाय तसेच विविध कारणांमुळे विविध ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कदम घराण्यातील व्यक्ति या कुलसंमेलनानिमित्ताने एकत्र येणार असून घराण्याचा जाज्वल्य वारसा जपण्याचा मानस या मेळाव्यातून केला जाणार आहे. या कुलसंमेलनाच्य वेळी कुलदेवता श्रीतुळजाभवानीचा जागर गोंधळ तसेच ग्रामदेवता जननी देवी दर्शन, कदम कुळाचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. पोलादपूर तालुक्यातील सुप्रसिद्ध उद्योजक रामचंद्र रावजी कदम यांच्या चरित्रपर लिहिलेल्या शून्य ते शिखर या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. याप्रसंगी आखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ.सतीश कदम, छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध उद्योजक मनोज कदम, कोकण इतिहास परिषद सदस्य प्रवीण कदम, डॉ.सदानंद गावडे कदम, मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष कुमार कदम आणि मोडीलिपी अभ्यासक सुनील कदम या मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत.

निमंत्रक पोलादपूर तालुका कदम भावकी, मौजे वडघर कदम बंधू फौजदार गणपत कदम, शंकर कदम, दगडू कदम, विठोबा कदम (वडघर) असून कदम घराण्याच्या राज्यस्तरीय कुलसंमेलनास सर्व कदम बंधूंनी उपस्थित राहण्याचे आवाहन क्षत्रिय मराठा कदम परिवार महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अमरराजे कदम, सचिव रामजी कदम, मुख्य कार्यकारिणी सदस्य ज्ञानदेव उर्फ माऊलीशेठ कदम पाटील आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

# रोह्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांचा सामाजिक उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे स्वीय सहाय्यक अनिकेत पटवर्धन यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुका भाजपच्या वतीने गुरुवारी (दि. १२) सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आल होते. रोहा तालुका भाजपाध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून को.ए.सो. मेढे हायस्कूल येथील इयत्ता दहावीच्या ४५ विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर पॅड व पेनचे वाटप करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अमित घाग यांनी अनिकेत पटवर्धन यांच्या कार्याचा आढावा घेतला. तल्लख बुद्धिमत्तेच्या जोरावर लोकहिताचे निर्णय कशा पद्धतीने घेतले जातात तसेच संघटनात्मक कामकाजात त्यांचे योगदान कसे आहे, याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. आगामी दहावीच्या बोर्ड परीक्षा लक्षात घेता विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व नियोजनबद्ध अभ्यास करून यश संपादन करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

यापूर्वी याच शाळेत १७० विद्यार्थ्यांना शालेय बॅगांचे वाटप करण्यात आले होते. त्यावेळी उर्वरित ४५ दहावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी लेखन पॅड देण्याची मागणी शाळेकडून करण्यात आली होती. दिलेला शब्द पाळत आज ही मागणी पूर्ण करण्यात आल्याने शाळेचे मुख्याध्यापक यांनी अमित घाग यांचे विशेष आभार मानले.

या कार्यक्रमास युवा मोर्चा रोहा शहराध्यक्ष अनिल घरजाळे, धाटाव विभाग भाजपचे सचिन मोरे, मेढा विभागाचे चंदकांत गोवर्धन तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मध्य रेल्वेने विनातिकीट प्रवाशांकडून दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने विनातिकीट प्रवासाला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत. योग्य आणि पद्धतशीर तिकीट तपासणी मोहिमेद्वारे, मध्य रेल्वेने २०२५–२६ या आर्थिक वर्षात लक्षणीय निकाल मिळवले आहेत.

मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी आर्थिक वर्ष २०२५–२६दरम्यान अनुचित किंवा अवैध प्रवास करणाऱ्या ३४.३४ लाख प्रवाशांना तिकिटाशिवाय प्रवास करताना पकडले, दरम्यान दंड म्हणून २०३.७६ कोटी रुपयांची विक्रमी रक्कम वसूल करण्यात आली, जी गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत याच कालावधीत वसूल करण्यात आलेल्या १६७.६१ कोटी रुपयांच्या रकमेच्या तुलनेत २१% पेक्षा जास्त आहे.

उपनगरीय रेल्वे ही मुंबई विभागाची जीवनरेखा आहे आणि अनधिकृत प्रवास कमी करण्यासाठी वेळोवेळी विशेष तपासणी केली जाते. आर्थिक वर्ष २०२५–२६ दरम्यान, मुंबई विभागाच्या तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट/अयोग्य तिकीटासह प्रवास करणाऱ्या ९.४९ लाख उपनगरीय प्रवाशांकडून दंड म्हणून २७.३९ कोटी रुपये वसूल केला आहे.

मध्य रेल्वे प्रवाशांना आवाहन करते की, अधिकृत विक्रेत्यांनी किंवा रेल्वे स्टेशन बुकिंग काउंटरवरून किंवा एटीव्हीएमद्वारे जारी केलेल्या वैध तिकिटांसह प्रवास करावा किंवा त्यांनी त्यांच्या मोबाईल फोनवर वेबसाइटद्वारे रेल वन ॲप डाउनलोड करून रेल वन ॲपद्वारे तिकिटे बुक करू शकता. मध्य रेल्वे प्रवाशांना बनावट तिकिटे तयार करणे/मिळविणे आणि त्यावर प्रवास करण्याऱ्या फसव्या मार्गांचा वापर करू नये, असे आवाहन करते.

# शिवजयंतीला सरसगड प्रदक्षिणा

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड संघर्ष संस्थेमधील तरुणांनी रायगड प्रदक्षिणेप्रमाणे सरसगड प्रदक्षिणा शिवजयंतीला गुरुवारी (दि. १९) सकाळी ६ वाजता आयोजित केली आहे. यंदाचे हे दुसरे वर्ष असून मागील वर्षी ५२ जण या प्रदक्षिणेत सहभागी झाले होते.

या प्रदक्षिणेचा मार्ग खडतर आहे. सरसगड प्रदक्षिणेसाठी १०० रुपये नोंदणी फी आकारली आहे. नोंदणीसाठी अरविंद दंत (९२७२०७१५३४), कपिल पाटील (९२२६७८४२५५), अमित निंबाळकर (९२७३७९०८५०), प्रदीप गोळे (८०८७५६९२९२) व मिलिंद गोळे (८४४६२८८१४२) यांच्याकडे करावा. इतर माहिती, अटी व शर्ती नोंदणी करताना दिल्या जातील. प्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने ऐतिहासिक वारसा जतन करणे आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणे हाच मुख्य उद्देश आहे.

# जि.प. सदस्य सुमित काते यांचा सन्मान



**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठणे गटाचे नवनिर्वाचित सदस्य सुमित काते यांचे नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनकडून अभिनंदन करण्यात आले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

राजिप सदस्य सुमित काते यांच्या नागोठण्यातील निवासस्थानी नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, सहसचिव राजेंद्र जोशी, सदस्य राजेश पिंपळे यांनी जाऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी शिवसेनेचे रोहा उपतालुकाप्रमुख मनोज खांडेकर, नागोठणे विभागप्रमुख प्रवीण ताडकर, निलेश साळवी आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

जि.प. सदस्य सुमित काते यांचे अभिनंदन करतानाच रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठणे मतदारसंघातील सर्व विकासकामांसाठी तसेच गावे, आदिवासीवाड्यांवर रखडलेले विविध प्रश्न, समस्या मार्गी लावण्यासाठी तसेच जनतेच्या हिताच्या योजनांसाठी नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशन आपल्या सोबत असेल, असे अभिवचन या वेळी नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश पवार यांनी दिले.

# वाकडाई देवी मंदिर वर्धापन दिनानिमित्त माणगावात महोत्सव


**माणगाव : प्रतिनिधी**

समस्त माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या मौजे उतेखोल, उतेखोलवाडी येथील श्री वाकडाई देवी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त सलग तिसऱ्या वर्षी भव्य पालखी महोत्सवाचे आयोजन उतेखोल याठिकाणी शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे.

सर्व भाविकांनी सहकुटुंब, सहपरिवार, मित्रमंडळी यांच्यासह उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घ्यावा असे अवाहन ग्रामस्थ व महिला मंडळ उतेखोल गाव व उतेखोलवाडी यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

सकाळी ७ वा.श्री वाकडाई देवी अभिषेक, सकाळी ८ वा.श्री वाकडाई देवी मंदिर ते हनुमान मंदिर पालखी मिरवणूक सायंकाळी ७ वा. देवीची महाआरती, सायंकाळी ७.३० ते रात्री १० वा. सर्वांना महाप्रसादाचा असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

पालखी महोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी श्री



वाकडाई देवी मंदिर उत्सव कमिटी २०२६ अध्यक्ष सुधाकर पालकर, कार्याध्यक्ष प्रवीण मोने, उपाध्यक्ष राजेश सोंडकर, दीपक मढवी,सचिव समीर जाधव, सहसचिव सागर मुंढे, खजिनदार विजय मुंढे, सहखजिनदार प्रकाश मोरे, सल्लागार अनंत थळकर, आत्माराम जाधव, रामचंद्र मुंढे, शांताराम बुटे, भारतानंद गुरव, राहुल पाकेरे, नारायण मुंढे, गजानन मढवी, दत्ताराम उभारे, शांताराम जठार, सदानंद काळे, सुनील बुटे यांच्यासह ग्रामस्थ व महिला मंडळ उतेखोल गाव व उतेखोलवाडी आदी परिश्रम घेत आहेत.

### टी-२० वर्ल्डकपमध्ये मोठा उलटफेर

# झिम्बाब्वेकडून ऑस्ट्रेलियाचा पराभव

**कोलंबो : वृत्तसंस्था**

यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमध्ये तुलनेने दुबळे समजेले संघ मोठ मोठ्या संघांना चांगलाच घाम फोडत आहेत. अशाच प्रकारे शुक्रवारी (दि.१३) झालेल्या एका सामन्यात झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाचा २३ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या झिम्बाब्वेने २० षटकात २ बाद १६९ धावा ठोकल्या होत्या. प्रत्युत्तरात खेळताना ऑस्ट्रेलियाला १९.३ षटकात १४६ धावाच करता आल्या. झिम्बाब्वेकडून १७ धावात चार विकेट घेणारा ब्लेसिंग मुझाराबानी हा सामनावीर ठरला.



प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने २० षटकात २ बाद १६९ धावा ठोकल्या. त्यात सलामीवीर ब्रायन बेनेटने नाबाद ६४ धावा केल्या, तर दुसरा सलामीवीर मारूमानीने ३५ धावांचे योगदान दिले. त्यानंतर आलेल्या रायन ब्रंटनेदेखील ३५ धावा केल्या, तर सिकंदर रझाने २५ धावा करत संघाला १६९ धावांपर्यंत पोहचवले. ऑस्ट्रेलियाकडून स्टॉयनिस आणि ग्रीनने प्रत्येकी एक विकेट घेतली.

झिम्बाब्वेचे विजयासाठीचे १७० धावांचे आव्हान घेऊन उतरलेल्या ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. झिम्बाब्वेच्या वेगवान माऱ्यासमोर त्यांची अवस्था चार बाद २९ धावा अशी बिकट झाली होती. मुझाराबानीने 'कांगारूं'ना पाठोपाठ धक्के देण्यास सुरूवात केली होती. ही पडझड रॅनशॉ आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी थोपवण्याचा प्रयत्न केला. मॅक्सवेलने ३१, तर रॅनशॉने ६५ धावांचे योगदान दिले, मात्र रॅनशॉ बाद झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या पराभवावर शिक्कामोर्तब झाले. त्यांचा संपूर्ण डाव १९.३ षटकात १४६ धावात संपुष्टात आला.

**२००७ची पुनरावृत्ती**

विशेष म्हणजे झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला लक म्हणून हरवले नाही, तर त्यांची टी-२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाला हरवण्याची जुनीच सवय आहे. त्यांनी यापूर्वी कधीही टी-२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाकडून पराभव स्वीकारलेला नाही. याआधी झिम्बाब्वेने २००७च्या पहिल्या टी-२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाचा पराभव केला होता. आता २०२६च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये झिम्बाब्वेने पुन्हा एकदा हा कारनामा करून दाखवला आहे.

# एमसीएचे प्रौढ गटातील सामने रायगडात खेळवले जाणार

**अलिबाग : प्रतिनिधी**



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रौढ गटातील क्रिकेट सामने रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर खेळले जाणार आहेत.

स्पर्धेतील ग्रुप डी मध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) संघाचा समावेश आहे. रायगडसह नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन, वायएमसीए क्रिकेट क्लब, सीडीए क्रिकेट क्लब पुणे, सीओएम क्रिकेट क्लब पुणे व सेंट्रल झोन असे सहा संघ या गटात आहेत.

साखळी फेरीतील एकूण १५ दोन दिवसीय सामने खेळले जातील. या सामन्यांसाठी रायगड जिल्ह्यातील एमसीए प्रमाणित पंच व गुणलेखक सामना अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

पेण नगरपालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट मैदान, नागोठणे येथील रिलायन्स क्रिकेट मैदान, रसायनी पाताळगंगा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स मैदान आणि गव्हाण उलवे येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर हे सामने खेळले जाणार आहेत.

आरडीसीएच्या यजमानपदाखाली हे सामने दोन दिवसीय कसोटी फॉरमॅटनुसार होतील.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील आणि सचिव प्रदीप नाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार सर्व पदाधिकारी व सदस्य सामन्यांचे यशस्वीरित्या आयोजन व्हावे यासाठी परिश्रम घेत आहेत. रायगड जिल्ह्यातील सर्व युवा क्रिकेट खेळाडू व क्रिकेटप्रेमींनी क्रिकेट सामन्यांचा आनंद घेण्यासाठी मैदानावर उपस्थित राहण्याचे आवाहनही आरडीसीएतर्फे करण्यात आले आहे.

यापूर्वीदेखील एमसीएचे सामने रायगड जिल्ह्यात खेळले गेले आहेत. ही खेळाडूंसाठी पर्वणी असून एक चांगले व्यासपीठ उपलब्ध होत आहे.

# किकबॉक्सिंगमध्ये अन्वी नाईकला 'सुवर्ण'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागात इयत्ता तिसरीत शिकणारी अन्वी प्रशांत निकम हिने दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड असोसिएशन ऑफ किकबॉक्सिंग अंतर्गत आयोजित ओपन इंडिया इंटरनॅशनल किकबॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे.



या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी देशभरातील विविध राज्यांतून शेकडो खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये अन्वीने दाखवलेल्या कौशल्य, जिद्द आणि आत्मविश्वासामुळे तिने अव्वल स्थान मिळवले. तिच्या या यशामुळे सीकेटी विद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अन्वीचे विशेष कौतुक करत शाब्बासकीची थाप दिली.

दरम्यान, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही अन्वीचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भारताचा नामिबियावर एकतर्फी विजय; इशानचे अर्धशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या रणांगणात भारताने दुबळ्या नामिबिया संघावर एकतर्फी मात केली. इशान किशनची वादळी फलंदाजी, हार्दिक पांड्याचा अष्टपैलू तडाखा आणि वरुण चक्रवर्तीच्या फिरकीचे जाळे यांच्या जोरावर भारताने नामिबियावर ९३ धावांनी दणदणीत विजय मिळवला. २०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नामिबियाचा डाव १८.२ षटकांत अवघ्या ११६ धावांत कोसळला.



नामिबियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीचे आमंत्रण दिले, पण हा निर्णय त्यांच्यावरच उलटला. सलामीवीर इशान किशनने (६१ धावा, २४ चेंडू) दिल्लीच्या मैदानात चौकार-षटकारांची आतषबाजी केली. त्याने आपल्या खेळीत सहा चौकार आणि पाच उत्तुंग षटकार खेचत नामिबियाच्या गोलंदाजीची पिसे काढली.

मधल्या फळीत कर्णधार सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा स्वस्तात बाद झाले तरी हार्दिक पांड्याने (५२ धावा, २८ चेंडू) 'कुंग-फू' स्टाईलने फटकेबाजी करत डावाची सूत्रे हाती घेतली. हार्दिकने चार चौकार आणि चार षटकारांसह आपले अर्धशतक पूर्ण केले. शेवटच्या टप्प्यात शिवम दुबेच्या २३ धावांच्या जोरावर भारताने २० षटकांत ९ बाद २०९ धावांचा डोंगर उभा केला. नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मसने चार बळी घेतले, पण तोपर्यंत भारताने विजयाची पायाभरणी केली होती.

२१० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना नामिबियाची सुरुवात खराब झाली. अर्शदीप सिंगने भारताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर मधल्या षटकांत वरुण चक्रवर्तीने आपल्या फिरकीच्या जाळ्यात नामिबियाच्या फलंदाजांना असे काही गुंफले की त्यांना डोके वर काढण्याची संधीच मिळाली नाही. वरुणने अवघ्या सात धावा देऊन तीन महत्त्वाचे बळी टिपले.

अक्षर पटेलने दोन बळी घेत मधली फळी कापून काढली, तर जसप्रीत बुमराहने आपल्या भेदक माऱ्याने तळाच्या फलंदाजांची दाणादाण उडवली. अखेरच्या षटकांत हार्दिक पांड्याने दोन बळी घेत नामिबियाच्या डावावर शिक्कामोर्तब केले. नामिबियाकडून लॉरेन स्टीनकॅम्प (२९) आणि जॅन फ्रिलिंक (२२) यांनी थोडा प्रतिकार केला, पण भारतीय आक्रमणासमोर त्यांचा निभाव लागला नाही.

# विरार येथे जेबीपीएल रंगणार

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील जसवली बागमांडला विभाग क्रिकेट संघटनेच्या वतीने जसवली बागमांडला विभाग प्रीमियर लीग (जेबीपीएल) क्रिकेट स्पर्धेचे आयोजन १५ फेब्रुवारी रोजी नारंगी मैदान, विरार येथे करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता होणार असून बक्षीस वितरण समारंभ रात्री ११.३० वाजता पार पडणार आहे. विभागातील क्रिकेटप्रेमींसाठी ही स्पर्धा विशेष आकर्षण ठरणार आहे.

संस्थापक विजय कांबळे, अध्यक्ष उमेश धामणे, सचिव सुशील टाकले आणि खजिनदार प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

# श्रीलंकेने ओमानला सहज नमवले

**पल्लेकेल्ले : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकात श्रीलंकेच्या फलंदाजांनी ओमानच्या गोलंदाजीची पिसे काढत १०५ धावांनी मोठा विजय नोंदवला. रत्नायकेचे धडाकेबाज पहिले अर्धशतक आणि दासून शनाकाच्या वादळी खेळीच्या जोरावर श्रीलंकेने ५ बाद २२५ अशी या हंगामातील सर्वोच्च धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात ओमानला २० षटकांत ९ बाद १२० धावांवर समाधान मानावे लागले. या विजयासह लंकेने 'ड' गटात सलग दोन विजयांसह अव्वल स्थान पटकावले आहे.


कर्णधार दासून शनाकाने अवघ्या १९ चेंडूंत अर्धशतक झळकावले, हे ठळक वैशिष्ट्य ठरले. लंकेकडून विश्वचषकातील हे सर्वात जलद अर्धशतक ठरले. सलामीवीर रत्नायकेनेही कारकिर्दीतील पहिले, तर कुशल मेंडिसने (६१) सलग दुसरे अर्धशतक साजरे केले. अखेरच्या चार षटकांत श्रीलंकेने ६५ धावा कुटल्या. १९७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ओमानचा डाव सातत्याने गडगडत राहिला. चमिरा (२/१९), तिक्षणा (२/११) यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

आयसीसी टी-२० विश्वचषकात मोहम्मद नदीम अर्धशतक झळकावणारा सर्वात ज्येष्ठ फलंदाज ठरला. त्याने ४३ वर्षे, १६१ दिवस वय असताना हा पराक्रम गाजवला, मात्र त्याला अन्य फलंदाजांची साथ न लाभल्याने ओमानला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला.

# रियान पराग करणार राजस्थान संघाचे नेतृत्व

**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने स्पर्धेतील पहिल्याच हंगामात जेतेपदाचा मान पटकावला होता. त्यानंतर राजस्थानने अंतिम फेरीत प्रवेश केला, पण जेतेपदाची ट्रॉफी उंचावता आलेली नाही. संजू सॅमसनननने संघाची साथ सोडल्यानंतर कर्णधारपदाची जागा रिकामी होती. ईएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या वृत्तानुसार ही जागा भरून काढण्यासाठी २४ वर्षीय रियान परागची निवड करण्यात आली आहे.



रियान परागकडे राजस्थान रॉयल्स संघाचे नेतृत्व करण्याचा अनुभव आहे. गेल्या हंगामात कर्णधार संजू सॅमसन दुखापतग्रस्त झाल्यानंतर नेतृत्वाची जबाबदारी रियान परागकडे सोपवण्यात आली होती. आयपीएल २०२६ स्पर्धेआधी संजू सॅमसनने चेन्नई सुपर किंग्ज संघात प्रवेश केला आहे. संजूच्या मोबदल्यात रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांना राजस्थान संघात स्थान देण्यात आले आहे.

# राज्य प्रौढ गट कबड्डी संघाचे सराव शिबिर आवास येथे सुरू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य प्रौढ गट कबड्डी संघाचे सराव शिबिर अलिबाग तालुक्यातील आवास येथे १२ ते २२ फेब्रुवारीपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी राज्यातून सुमारे ३३ खेळाडू आले असून निवड झालेले १२ खेळाडू बडोदा येथे राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी जाणार आहेत.



सराव शिबिरात मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी खेळाडूंच्या उन्नतीसाठी सहकार्य केले जाईल, असे म्हटले. माजी कार्यवाह आस्वाद पाटील यांनीही खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले.

शिबिरास छत्रपती पुरस्कार विजेते व महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे प्रशिक्षक रमेश भेंडीगिरी, छत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे, राजेश पाडावे, कार्याध्यक्ष दत्ता कळमकर, राष्ट्रीय खेळाडू अर्जुन शिंदे, खजिनदार जगदीश पाटील, ज्येष्ठ खेळाडू दत्ता पिंगळे, प्रदीप कटोर, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सहकार्यवाह जे.जे. पाटील, सहकार्यवाह प्रथमेश पाटील, सदस्य सुमित माने, आवासचे माजी सरपंच अभिजीत राणे, शिबिर व्यवस्थापक गणेश राणे आदी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंगमध्ये पनवेलचे खेळाडू चमकले

## चार सुवर्णांसह १३ पदकांची कमाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशन, स्पोर्ट्स ऑथोरिटी ऑफ इंडिया तसेच जेके टायर प्रस्तुत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाको इंडिया आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग टूर्नामेंट कप २०२६ के.डी जाधव इनडोअर इंदिरा गांधी स्टेडियम, दिल्ली येथे पार पडली.

या स्पर्धेत भारतीय संघामध्ये पनवेल शहरांमधील १० खेळाडूंची निवड झाली होती तसेच संपूर्ण महाराष्ट्रामधून ९१ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता तसेच परराज्यातील व परप्रांतीय देश पलेस्टाईन, उझबेकिस्तान, इराक, इटली, कझाकिस्तान, स्विझर्लंड, नेपाळ, युरोप यासोबत २५ देशातील खेळाडूंचा समावेश होता



पनवेल शहरातील नऊ वर्षाआतील व २४ किलो वजनी गटात अन्वी निकम हिने पॉईंट फाईट इव्हेंटमध्ये सुवर्णपदक, १२ वर्षाआतील व ४२ किलो वजनी गटात काव्य सेजल हिने किक लाईट इव्हेंटमध्ये सुवर्णपदक, १२ वर्षाआतील व +४७ किलोवरील वजन गटामध्ये अर्णव इंगोले याने किकलाईट व पॉईंट फाईव्ह इव्हेंटमध्ये दोन सुवर्णपदके, १५ वर्षातील व ३२ वजनी गटात रोनल पाटील याने किकलाईट व लाईट कॉन्टॅक्ट इव्हेंटमध्ये दोन रौप्यपदके, १५ वर्षाआतील व ३७ किलो वजनी गटामध्ये शुभम पवार याने किकलाईट व लाईट कॉन्टॅक्ट इव्हेंटमध्ये एक रौप्य व एक कांस्यपदक, १५ वर्षाआतील व ३७ किलो वजनी गटामध्ये श्रेया कुडलकर हिने पॉईंट फाईट व किकलाईट इव्हेंटमध्ये दोन कांस्यपदक, १८ वर्षाआतील व ४८ किलो वजनी गटात सानिया शेख हिने लोकिक इव्हेंटमध्ये रौप्यपदक, १९ वर्षावरील व +९० किलोवरील वजनी गटात आर्यन शिवतरकर याने लोकिक इव्हेंटमध्ये कांस्यपदक पटकाविले

किकबॉक्सिंग आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजय झालेल्या खेळाडूंच्या यशामागे पनवेल शहर किकबॉक्सिंगचे अध्यक्ष परेश ठाकूर, सचिव मंदार पनवेलकर, कार्याध्यक्ष व सीनियर प्रशिक्षक निलेश भोसले, प्रशिक्षक योगेश बाईकर, रोहित थळी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पारितोषिक वितरण समारंभात वाको इंडिया किकबॉक्सिंग फेडरेशनचे अध्यक्ष संतोष अग्रवाल, वाको महाराष्ट्र अध्यक्ष निलेश शेलार यांनी खेळाडूंचे कौतुक करून त्यांना वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पधसाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांचे परिसरात अभिनंदन करण्यात येत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com